# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


## रिक्षा-पिकअप अपघातात महिलेचा मृत्यू

**रसायनी :** आपटा गावातील मारुती गणपती मंदिरासमोर रिक्षा व पिकअपचा अपघात झाला. या अपघातात महिलेचा मृत्यू तर तिघेजण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि.२४) घडली. राम भोईर हा लाडीवली ते आपटा असा रिक्षा चालवित जात होता. त्याची रिक्षा आपटा गावाच्या हद्दीत उभा गणपतीसमोर आली असता समोरुन भरधाव वेगाने पिकअप टेम्पो आला. त्यामुळे रामचा रिक्षाच्या वेगावरील ताबा सुटला. यामुळे रिक्षा पिकअप टेम्पोला धडकून पलटी झाली व अपघात घडला. या अपघातात राम भोईर, पान ५ वर


महालक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र
कासू/पेण/रायगड
कासू रेल्वे स्टेशनजवळ चालवायला देणे आहे.
इच्छुकांनी संपर्क साधावा :
मोहन वेखंडे - ९८५००१५२०१/८१४९४८०८४८
सुविधा १५ रुम + स्विमिंग पूल/रेनडान्स, गार्डन एरिया, किचन-२/चुल. कॉन्फरन्स हॉल + ओपन रेस्टॉरंट, टॉप फ्लोअर, रिसेप्शन, कार्यक्रम हॉल + लॉन एरिया, मोठा पार्किंग एरिया + प्लेग्राऊंड सोबत विविध सुविधा उपलब्ध.







### आजचा अग्रलेख

**कुठून येणार चारशे?**

## वेधक


### यवतमाळमध्ये नितीन गडकरींना भोवळ

**यवतमाळ :** यवतमाळ वाशिम-लोकसभा मतदारसंघातील पुसद येथील सभेमध्ये मंत्री नितीन गडकरी यांना भोवळ आल्याची घटना घडली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत बोलताना गडकरी यांना भोवळ आल्याने त्यांना लगेच तेथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर थोड्याच वेळाने त्यांनी पुन्हा सभेला सुरुवात केल्याची माहिती समोर आली. गडकरी महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचार सभेसाठी पुसदमध्ये आले होते. दुसऱ्या टप्प्यातील प्रचाराचा बुधवारी शेवटचा दिवस होता. सध्या विदर्भात उन्हाचा पारा ४२ डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त जात असून या उष्णतेमुळेच गडकरींना भोवळ आली असल्याची प्राथमिक माहिती आहे.

### मतदान यंत्रावरुन 'सर्वोच्च' चर्चा

**नवी दिल्ली :** ईव्हीएम व्हीव्हीपॅटच्या मुद्द्यांवर बुधवारी झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. फक्त संशयाच्या आधारावर आम्ही आमचा निकाल जारी करु शकत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने काही प्रश्न उपस्थित केले होते, ज्याची उत्तरं आम्हाला मिळाली आहेत. त्यामुळे निर्णय राखून ठेवला असल्याचेही सांगण्यात आले आहे. ईव्हीएम वरच्या सुनावणीबाबत बोलताना न्यायाधीश दीपांकर दत्ता हे प्रशांत भूषण यांना म्हणाले की, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटवर संशय आहे, या आधारावर आम्ही आदेश कसा द्यायचा? जो अहवाल आम्हाला देण्यात आला आहे, त्यानुसार ईव्हीएम हॅक केल्याची पान ५ वर

# 3008 मतदार करणार गृहमतदान



**28227** वयोवृद्ध | **8,494** दिव्यांग

## जाणार मतदार केंद्रांवर

**सुयोग आंग्रे**

**। रायगड ।**

रायगड लोकसभा मतदारसंघात वयाची शंभरी पार केलेले १ हजार ४२८ मतदार असून ८५ वर्षांवरील एकूण ३० हजार ८२० मतदार आहेत. दिव्यांग मतदारांची संख्या देखील ८ हजार ९०९ आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना घरबसल्या देखील मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. त्याअनुषंगाने त्यांच्याकडून पर्याय घेण्यात आले. पण, जिल्ह्यातील ८५ वर्षांवरील तब्बल २८ हजार २२७ वृद्धांनी मतदान केंद्रांवर येऊनच मतदान करणार असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांना सांगितले. दुसरीकडे ४१५ दिव्यांग वगळता सर्वजण मतदानासाठी केंद्रांवरच येणार आहेत. त्यामुळे आता दोन हजार ५९३ मतदार घरुनच मतदान करणार असल्याचे निश्चित झाले आहे. वृद्ध, दिव्यांग मतदार आपला हक्क केंद्रांवर येवून बजावणार आहेत, मग सर्वांनीच निश्चितपणे मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

ग्रामपंचायतींची निवडणूक वगळता २०१९ पासून एकही निवडणूक झालेली नाही. जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, पंचायत समित्यांवर दोन वर्षांपासून प्रशासकराज आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर पाच वर्षांनंतर आता लोकसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे मतदारांमध्ये कमालीची उत्सुकता असून राज्यातील राजकीय समीकरणे बदलल्याने आपल्या नेत्यांचे पारडे तथा राजकीय वजन टिकले पाहिजे, विकासाची कामे करणारा उमेदवार विजयी व्हायला हवा, या हेतूने ८५ वर्षांवरील वृद्ध मतदार देखील केंद्रांवर येऊनच मतदान करणार असल्याचे सांगत आहेत.

काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील ८५ वर्षांवरील प्रत्येक मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यापैकी कितीजण घरबसल्या किंवा मतदान केंद्रांवर येऊन मतदान करणार पान ५ वर

**रायगड लोकसभा मतदारसंघात गृहमतदानाचा पर्याय ३,००८ मतदारांनी निवडला आहे. यामध्ये २ हजार ५९३ वयोवृद्ध आणि ४१५ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. वयोवृद्ध मतदारांमध्ये पेण विधानसभा ५११, अलिबाग विधानसभा २२८, श्रीवर्धन ४३१, महाड २९४, दापोली ५८० आणि गुहागर मतदारसंघातील ५४९ मतदारांचा समावेश आहे. दिव्यांग मतदारांमध्ये पेण विधानसभा मतदारसंघात ६९, अलिबाग २२, श्रीवर्धन ९४, महाड ५१, दापोली ९३ आणि गुहागर विधानसभा मतदारसंघातील ८६ मतदारांचा समावेश आहे.**

## कर्नाटक सरकारचे मुस्लिमांना ओबीसीतून आरक्षण!

**। कर्नाटक । वृत्तसंस्था ।**

मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी कर्नाटक सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. मुस्लिमांचा समावेश ओबीसी प्रवर्गामध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणाची माहिती राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने म्हटलं की, कर्नाटक सरकारच्या आकडेवारीनुसार कर्नाटकमधल्या मुस्लिमांमधील सगळ्या जाती आणि समुदायांना राज्य सरकारने नोकरी, शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण दिले आहे. मुस्लिमांचा ओबीसींमध्ये समावेश करण्यात आला आहे. श्रेणी ब अंतर्गत कर्नाटक राज्यातील सर्व मुस्लिमांना ओबीसी ठरवण्यात आले आहे. आयोगाने म्हटलं की, श्रेणी - १ मध्ये पान ५ वर

# सत्तेत आल्यास कर्जमाफी

### अमरावतीमधील सभेत राहुल गांधींचे आश्वासन

**। अमरावती । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत देशात काँग्रेसचे सरकार आल्यास शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक क्रांतिकारी योजनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिले आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी राहुल गांधी यांनी सभा घेतली. यावेळी राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले.

राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी गेल्या १० वर्षात तुमचं कर्ज माफ केले नाही. पण आम्ही सत्तेत आल्यावर तुमचं कर्ज लगेच माफ करु. याशिवाय, देशात एका कृषी आयोगाची स्थापना केली जाईल. जेव्हा कोणत्याही राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज पडेल तेव्हा हा आयोग सरकारला कर्जमाफीची शिफारस करेल. त्यामुळे केवळ एकदाच नव्हे तर अनेकदा कर्जमाफी होईल. पान ५ वर

### महिलांसाठी मोठी घोषणा

राहुल गांधी यांनी अमरावतीमधील सभेत महालक्ष्मी योजनेची घोषणा केली. आम्ही प्रत्येक कुटुंबाची यादी तयार करणार आहोत. प्रत्येक कुटुंबातून एका महिलेची निवड केली जाईल. या महिलेच्या बँक खात्यात काँग्रेस पक्षाचं सरकार, इंडिया आघाडीचं सरकार प्रत्येक महिन्याला ८ हजार ५०० रुपये या हिशेबाने वर्षाला प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात एक लाख रुपये जमा करेल, अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली. देशातील कोट्यवधी महिलांना महालक्ष्मी योजनेचा लाभ मिळेल, असा दावाही राहुल गांधी यांनी केला.

# श्रीवर्धनच्या खाडीत आढळला समुद्री घोडा

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**



श्रीवर्धन तालुक्यातील काळिंजेच्या खाडीत स्थानिक मच्छिमार अनीस फणसोपकर यांना दुर्मिळ समुद्री घोडा सापडला. ही बाब लक्षात येताच त्याला त्यांनी जाळ्यातून बाहेर काढत पुन्हा खाडीत सोडले. या आधी देखील अशी विविध प्रकारची जैवविविधता या ठिकाणी आढळून आल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

श्रीवर्धन तालुक्यापासून १३ किमी अंतरावरील काळिंजे गावामध्ये १९० हेक्टर क्षेत्रावर कांदळवन पसरले आहे. या बेटावर मलईयुक्त क्षेत्र आहे. येथील स्थानिकांचा मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. मच्छीमार अनीस फणसोपकर खाडीत मासेमारी करत असताना त्यांना जाळ्यात समुद्री घोडा आढळला. जाळ्यात नारंगी रंगाचा समुद्री घोडा आढळल्याची माहिती फणसोपकर यांनी दिली. त्यांनी लागलीच या समुद्री घोड्याला जाळ्याबाहेर काढले आणि याची माहिती पान ५ वर


PRO IIT ACADEMY
Coaching Classes
For 11th & 12th Students
NOW IN ALIBAG
ENTRANCE EXAMS
JEE NATA
CET UID
NEET UCEED
PRE-BOOK YOUR SEATS NOW !!!
Address:
PEN : MANOHAR NIWAS, 2nd Floor, Chinchpada, Near Soham Hospital, Raigad-402 107.
ALIBAG : 201/ B wing, Tanmay Enclave Society, Old Post Lane, Opp. Rajasthan Bhojanalay, Alibag-402 201.
ROHA : Above Roha Bust Stand, Roha-402 109
8390750389 / 9762026512



PNP Cyrus Poonawalla SCHOOL, NAGAON CBSE CURRICULUM
UV SPORTS ACADEMY
Summer Swimming Camp
for Kids and Adults (Male and Female)
Date: 2nd May to 3rd June 2024

| For Kids (5 to 15 years) | For Adults |
|---|---|
| 8 a.m. to 9 a.m. | 5 p.m. to 6 p.m. |
| 9:30 a.m. to 10: 30 a.m. | 6:30 p.m. to 7:30 p.m. |

Venue: PNP Cyrus Poonawalla School, Nagaon
Fee Rs.1700/- for 30 days
Transport facility available from Alibag (Raigad Bazar) to PNP Cyrus Poonawalla School, Nagaon at an additional cost

Contact Number:
9272594803 | 7745011000 | 9673371587


## उद्यानातील पालापाचोळ्याचे होणार विघटन



### पालिकेच्या उद्यान विभागाकडून चार ठिकाणी 'वुड श्रेडिंग मशीन'

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पालिका हद्दीतील उद्यानात जमा होणाऱ्या पालापाचोळ्याचे लवकरात लवकर विघटन करून त्यापासून खत निर्मिती करता यावी, यासाठी पालिकेकडून चार ठिकाणी वुड श्रेडिंग मशीन बसवण्यात येणार आहेत. यामुळे पालापाचोळ्याच्या विघटनासाठी लागणारा वेळ कमी होणार असून, जास्तीत जास्त खत निर्मिती होणार आहे.

पनवेल पालिका हद्दीत समाविष्ट सिडको वसाहतीमधील ५५ उद्यानांचे पालिकेकडे हस्तांतरण झाले आहे. ही उद्याने सुशोभित करण्यासाठी पालिका प्रशासनाचे उद्यान विभाग काम करत आहे. या ठिकाणी मोठ्या संख्येने वृक्षाची लागवड करण्यात आली असल्याने दररोज या ठिकाणी पालापाचोळा जमा होतो. उद्यानांमध्ये जमा होणारा पालापाचोळा गोळा करून त्यांचे विघटन करण्याच्या हेतूने उद्यानातच खत कुंड्या तयार करण्यात आल्या आहेत. या ठिकाणी पालापाचोळ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खत निर्मिती केली जाते. मात्र या प्रक्रियेला पन्नास ते साठ दिवसाचा कालावधी लागतो. पान ५ वर


संपूर्ण मनःशांतीसाठी कंपनी-फिट CNG
Hyundai कंपनीच्या CNG कार अस्सल वॉरंटी, वर्धित सुरक्षा आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शन युक्त
Grand i10 NIOS लाभ ₹ 48 000* पर्यंत
AURA लाभ ₹ 33 000* पर्यंत

शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन
खास ट्यून केलेले सस्पेन्शन
सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य)
कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन
डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग
RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले
HYUNDAI
3 YEAR 1 00 000km** Warranty Coverage
UPTO 7 YEARS Extended Warranty^
3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
3 YEARS Road Side Assistance (RSA)#
UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package
UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package
*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565
Give a missed call on 9555295868
my Hyundai app
Hyundai Promise Certified Pre-Owned Car
Hyundai Cl!ck to Buy Scan here
*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 1 00 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.
शरयू ह्युंदाई पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111
विशाल ह्युंदाई पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907

## वे|ध|क

### मतदान जागृतीसाठी पोस्टर बॅनर, सेल्फी पॉईंट

**पनवेल :** सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सेल्फी पॉईंट बनविण्यात आले आहेत. महापालिकेच्या मुख्यालयातील सेल्फी पॉईंटचे उद्घाटन आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व स्वीप पथकप्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप, सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांनी सेल्फी काढून केले. तसेच मतदान करणे हे नागरिकांचे सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य आहे, असा संदेश दिला. महापालिकेच्या वतीने खारघर रेल्वेस्थानक, ओरायन मॉल, पनवेल बस स्टॅन्ड आदी विविध ठिकाणी मतदान जागृती करण्यासाठी सेल्फी पॉईंट बसविण्यात आले आहेत. तसेच महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पोस्टर, बॅनरच्या माध्यमातूनही मतदान जागृती केली जात आहे. पिसार्वे येथे बचतगटाच्या महिलांच्या बैठका घेऊन त्यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. स्वीप कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी पनवेलमधील शिवाजीनगर झोपडपट्टी, इंदिरानगर, महालक्ष्मी झोपडपट्टीमध्ये मतदान नोंदणी व जनजागृती कार्यक्रम राबविले. याचबरोबर ठाणा नाका, इंदिरा नगर, तक्का, खारघर सेक्टर १२, सेक्टर १९, फर्शी पाडा, तळोजा सेक्टर ४० याठिकाणी आशा सेविकांनी नागरिकांच्या बैठका घेऊन जागृती केली आहे.

### मावळ मतदारसंघात ‘मनसे’ प्रचारापासून दूर

**पनवेल :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला असला तरी, मावळ मतदारसंघात महायुतीच्या प्रचारापासून ‘मनसे’ कोसोदूर आहे. यापूर्वी पनवेलमध्ये महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा आकुर्ली येथे झाला. त्यामध्येही मनसेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावण्यात आले नाही. त्यामुळे सामान्य मनसैनिक संभ्रमात आहेत.

मनसे आणि महायुतीचे प्रचारसूत्र अद्याप न ठरल्याने मनसे लोकसभेच्या निवडणुकीत प्रचाराच्या अंतिमवेळी सक्रीय होण्याची चिन्हे आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये कर्जत, पिंपरी, चिंचवड, मावळ, पनवेल आणि उरण हे विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. मावळ मतदारसंघात अजूनही कोठेही मनसेचे पदाधिकारी सक्रीय झाले नसल्याने महायुतीच्या व्यासपीठावर अजूनही मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांचे छायाचित्र दिसत नाही.

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारामधील फलकांवर राज ठाकरे यांचे छायाचित्र वापरले गेले नाही. त्यामुळे मनसेच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या पाठिंब्याच्या घोषणेनंतर मनसेचे नेते महायुतीच्या व्यासपीठावरून प्रचार करतील अशी अपेक्षा मनसैनिकांना होती. परंतु, अद्याप तरी मनसेच्या पदाधिकाऱ्यांना मनसेच्या वरिष्ठांकडून प्रचारासाठी कोणतीही सूचना मिळाली नाही. तसेच महायुतीचे पनवेलमधील नेत्यांकडून कोणतेही आमंत्रण आले नसल्याने मनसैनिक संभ्रमात पडले आहेत.

### बारणेच्या संपत्तीत ३० कोटीने वाढ

**कर्जत :** मावळमध्ये चौथ्या टप्प्यासाठी येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. त्यासाठी सर्वच उमेदवारांनी कंबर कसली आहे. महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनीही उमेवादारी अर्ज दाखल केला आहे. त्यासोबत त्यांनी प्रतिज्ञापत्रही दाखल केला आहे. या प्रतिज्ञापत्रातून बारणे यांच्या संपत्तीत गेल्या पाच वर्षात ३० कोटींची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बारणे यांच्याकडे एकूण ११४ कोटींची संपत्ती असून ते मावळमधील धनाढ्य उमेदवार ठरले आहेत.

२०१९ मध्ये श्रीरंग बारणे कुटुंबीयांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात तब्बल ८२ कोटी रुपयांची संपत्ती असल्याची माहिती दिली होती. आता मागील पाच वर्षात त्यांच्या संपत्तीत ३० कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. २०१४ मध्ये बारणे कुटुंबीयांची संपत्ती ६६ कोटी होती. २०१९ मध्ये त्यांची संपत्ती ८२ कोटी झाली. म्हणजे गेल्यावेळी त्यांच्या संपत्तीत ३५ कोटींची वाढ झाली होती. यंदा त्यांची संपत्ती ११४ कोटी दाखवण्यात आली असून गेल्या पाच वर्षात त्यांच्या संपत्तीत ३० कोटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे बारणे हे मावळमधील सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले आहेत. बारणे यांच्याकडे स्थावर आणि जंगम मालमत्ता आहे. त्यांच्याकडे अलिशान गाड्या आहेत. तसेच हिरे आणि सोन्याचे दागिनेही आहेत, तशी माहिती प्रतिज्ञापत्रातून देण्यात आली आहे. श्रीरंग बारणे हे दहावी नापास आहेत. शेती, बांधकाम व्यावसायिक आणि वीट कारखानदारी आदी व्यवसाय करत असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

### कर्जतमध्ये निवडणूक नियंत्रण कक्ष

**नेरळ :** मावळ लोकसभा मतदारसंघात असलेल्या कर्जत विधानसभा मतदारसंघात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. मतदारसंघात आदर्श आचारसंहिता राबविण्यासाठी जनतेला आचारसंहिता भंगाविषयक तक्रारी मांडण्यासाठी तसेच त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी १८९ कर्जत विधानसभा मतदार संघात नियंत्रण कक्ष स्थापन सुरु झाला आहे. कर्जत येथील प्रशासकीय भवनात हा नियंत्रण कक्षा सुरु झाला असून जनतेसाठी मोबाईल आणि दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. भारत निवडणूक आयोगामार्फत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे.१६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहिता भंगाविषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी,१८९ कर्जत विधानसभा मतदार संघात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला.त्यासाठी दुरध्वनी क्रमांक ०२१४८-२२२०३७, ९३७३९२२९०९ आहे अशी माहिती उपविभागीय अधिकारी कर्जत तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी १८९ कर्जत अजित नैराळे यांनी दिली आहे.

# प्रचार धनुष्यबाणाचा, कोंडी कमळाची

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

मावळ मतदारांघातील पनवेल तसेच उरण तालुक्यात शिंदे गटाचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्याबाबत नाराजीचा सूर आहे. अशातच मोदी सरकार आणण्यासाठी भाजपाचे नेते सर्व ताकदीने महायुतीच्या प्रचारात सहभागी झाले आहे. मात्र, मतदारांमध्ये शिंदे गटाच्या उमेदवारांबाबत नाराजी असल्यामुळे भाजप कार्यकर्त्यांची चांगलीच कोंडी झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

बारणे यांचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी महायुतीचे उमेदवार धडपडत आहेत. पनवेल विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण भागात शिंदे गटाला कुणीही जुमानत नसल्यामुळे प्रचारासाठी भाजपाचे कार्यकर्ते जास्त संख्येने भाग घेत असल्याचे पाहायला मिळत आहे. गळ्यात कमळ आणि हातात धनुष्यबाणाचा जाहिरनामा घेऊन भाजपाचे कार्यकर्ते घरोघरी प्रचार करताना दिसत आहे. मावळ लोकसभा मतदार संघातील पनवेल विधानसभा मतदार संघात घटक पक्ष असलेल्या शिवसेनेची ताकत पूर्वीपासूनच मर्यादित आहे. २०१६ साली पनवेल पालिकेसाठी झालेल्या निवडणुकीत सेना स्वतंत्रपणे उतरली होती. त्यावेळी पालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत सेनेची पाटी कोरी राहिली होती. मात्र, मोदी सरकारच्या बचावासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांना शिंदे गटाचा प्रचार करावा लागत आहे.



● पनवेलमध्ये महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करताना भाजप कार्यकर्ते.

## उरणमधील महायुतीच्या कार्यकर्त्यांत नाराजी

**। उरण । वार्ताहर ।**

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी करंजा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. परंतु, कार्यकर्त्यांची उपस्थिती नसल्याने त्यांच्यात उमेदवार बारणे यांच्यावर नाराजी असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे चाणजे ग्रामपंचायत सरपंच व इतर सदस्यांनी आ. महेश बालदी उपस्थित असतानाही बैठकीकडे पाठ फिरवली असल्याची चर्चा नाक्यांनाक्यावर सुरू आहे.



भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय महायुतीचे बारणे यांना जाहीर झाली होती. त्यानंतर महायुतीकडून प्रचार सुरू करण्यात आला होता. काही दिवसांपूर्वी करंजा गावात अशाच बैठकीचे आयोजन आ. बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी महायुतीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. मात्र चाणजे ग्रामपंचायतमध्ये भाजपाची सत्ता व एकूण ९ सदस्य असतानाही या बैठकीला भाजपचे अवघे दोनच सदस्य उपस्थित राहिले असल्याची धक्कादायक माहिती उपस्थित महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावरून सरपंचसह इतर सदस्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याचे दिसत आहे. या नाराजीचे परिणाम मावळ लोकसभा निवडणुकीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर महायुतीचे काही पदाधिकारी व कार्यकर्ते हे इतर पक्षात प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचे समजते.



● मावळ लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आ. रोहित पवार, आदित्य ठाकरे यांची उपस्थिती होती.

## मावळ मतदारसंघात तिरंगी लढत

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघात यापुर्वीच इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे -पाटील, महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आता वंचित बहुजन आघाडीच्या माधवी जोशी यांनी बुधवारी (दि.२४) उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे मावळ लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कर्जत येथील माधवी जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे जोशी यांनी शनिवारी वंचितमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळविली. महायुतीकडून खासदार श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीकडून माजी



महापौर संजोग वाघेरे आणि वंचितच्या माधवी जोशी यांच्या उमेदवारीमुळे तिरंगी लढत होणार आहे. सध्या संजोग वाघेरे तसेच श्रीरंग बारणे यांचा जोरदार प्रचार सुरु आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांसह महायुतीचे नेते प्रचारासाठी रस्त्यावर उतरले आहेत. मात्र, गेल्या पाच वर्षातील बारणेंच्या कार्यपद्धतीवर मतदार नाराज असल्याने संजोग वाघेरे यांचे पारडे जड असल्याची चर्चा मतदारांमध्ये सुरु आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहीले आहे.

## कोलाड-आंबेवाडी नाक्यावर शरद पवारांचे स्वागत



**। कोलाड । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा मतदार संघात निवडणुक प्रचाराला जोरदार रंग चढला असून दस्तुरखुद्द इंडीया आघाडीचे नेते शरदचंद्र पवार यांनी सुनील तटकरे यांच्या होम ग्राऊंडवर गीतेंच्या विजयासाठी कोलाड आंबेवाडी येथे श्री आंबरसावत महाराज मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ वाढवून शुभारंभ केला. रायगड लोकसभा निवडणुकीतून तटकरेना पराभूत करण्यासाठी तर अनंत गीते यांना लोकसभेत भरघोस मतांनी विजय होण्यासाठी आंबेवाडी येथील ग्रामदैवताला साकडे घातले. तसेच भ्रष्ट कारभारी नेत्यांना घरी बसविण्यासाठी ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार रायगडच्या मैदानात उतरले. तर तटकरेंच्या पराभवासाठी पवारांची तोफ रायगडात विशेषतः त्यांच्या बालेकिल्ल्यात रोहा तालुक्यातील कोलाड, आंबेवाडी नाक्यावर धडकताच इंडीया आघाडीच्या वतीने त्यांचे जल्लोषात करण्यात आला.

यावेळी शेकाप नेते आ. जयंत पाटील, आ.जितेंद्र आव्हाड, विष्णू पाटील, सुरेश खैरे, समीर शेडगे, दीपक तेंडुलकर, शंकरराव म्हसकर, राजेश सानप, गणेश शिंदे, चंद्रकांत लोखंडे, राजेंद्र राऊत, शिवराम महाबले, मारूती खांडेकर, मनोहर महाबले, विठ्ठलराव मोरे, राजेश काफरे, आदित्य कोंडळकर, अनिश शिंदे, बबलूशेठ सय्यद, शांताराम महाडिक, गणेश मढवी, सुनील महाडीक, मारूती बुवा लोखंडे, विष्णु लोखंडे, समिर महाबले, कुलदीप सुतार,बिन्धास्त धनावडे, अरविंद भिलारे, संकेत सोस्टे, बिलाल मोरबी, एलियाज डबीर, जुल्फिका डबीर, मझर सिद्दीक, अमीर तेलंगे, नितीन वारंगे, निलेश वारंगे, चेतना लोखंडे, संज्योत पडवळ, कस्तुरी सुतार, ऐश्वर्या शिंदे तसेच रोहा तालुक्यातील शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, आदी घटक पक्षांचे कार्यकर्ते, रोह्यातील शिवसेना, राष्ट्रवादी, शेकाप, काँग्रेस, आदी घटक पक्षातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## राजाभाऊ ठाकूर समन्वयकपदी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकिय पक्षाकडून जोरदार प्रचार सुरू आहे. विशिष्ट नेत्यांकडे महत्वाची जबाबदारी दिली जात आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांच्याकडे रायगड लोकसभा मतदार संघाच्या समन्वसक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांची नियुक्ती करीत त्यांना नियुक्ती पत्र दिले आहे.

दिवगंत माजी आ. मधुकर ठाकूर यांच्याकडून त्यांना राजकीय धडे मिळाले आहेत. नियोजनबध्द कामामुळे मध्यप्रदेशच्या निवडणूकीत त्यांना निरीक्षक म्हणून जबाबदारी दिली होती. इंडिया आघाडीचे उमेदवार गीते यांना विजयी करण्यासाठी योग्य ते नियोजन करावे, असे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रातून सूचित केले आहे.



> माझे वडील स्व. मधुकर ठाकूर यांच्या आशीर्वादाने राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. पक्षाच्या वरिष्ठांना आजवर सोपवलेली प्रत्येक जबाबदारी यशस्वी पार पाडली आहे. समन्वयक म्हणून दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडेन.
> – राजाभाऊ ठाकूर
> वरिष्ठ उपाध्यक्ष, काँग्रेस रायगड जिल्हा

## अनंत गीते बहूमतांनी निवडून येणार : वैभव चांदे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते रायगड लोकसभा मतदार संघातील निवडणूकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. त्यांच्या उमेदवारीने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे. कार्यकर्त्यांकडूनदेखील त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अनंत गीते या निवडणूकीत बहूमतांनी निवडून येतील, असा विश्वास शेकाप पोलादपूर तालुका चिटणीस वैभव चांदे यांनी व्यक्त केला.

गीते यांना निवडून देण्यासाठी शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या ताकदीने कामाला लागले आहेत. गावोगावी जाऊन वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून मतदारांना आवाहन केले जात आहे. शेतकरी कामगार पक्ष अनंत गीते यांच्या पाठीशी ठाम उभे आहेत. पोलादपूर तालुक्यात पहिली प्रचार फेरी पूर्ण झाली आहे. या प्रचाराच्यावेळी गीते यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांचे गावो, वाड्यांमध्ये जल्लोषात स्वागत केले जात आहे. शेकाप नेते आ. जयंत पाटील यांच्या आवाहनानंतर पोलादपूर तालुक्यातील शेकाप कार्यकर्ते कामाला लागले आहेत. माजी आ. पंडित, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील आदी नेते मंडळीमार्फत बैठका घेऊन मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

अनंत गीते यांनी गेली अनेक वर्षे केंद्रीय मंत्री म्हणून कामकाज पाहिले आहे. प्रशासनाचा त्यांना चांगला अभ्यास आहे.जनमानसात राहणारा नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. मतदारांसह कार्यकर्ते त्यांच्या स्वागतासाठी स्वंयस्फुर्तीने पुढे येत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या निवडणूकीत गीते बहूमतांनी निवडून येतील असा विश्वास असल्याचेही त्यांनी सांगितले.

## दिव्यांग मतदारांसाठी जनजागृती कार्यक्रम

**। महाड । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात मतदार जनजागृती कार्यक्रम युद्धपातळीवर राबविला जात आहे. त्याच धर्तीवर रायगड जिल्ह्यासह महाड तालुक्यातही मतदार जनजागृती कार्यक्रम विविध माध्यमातून राबविण्यात येत असून दोन दिवसापूर्वी तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना आपल्या सर्वोच्च लोकशाहीचा मतदानाचा अधिकार बजावता यावा, यासाठी तहसील कार्यालय आणि दिव्याग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मतदार जनजागृती कार्यक्रम चवदार तळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात राबविण्यात आला. यावेळी तालुक्यातील दिव्यांग मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिव्यांग व्यक्तिने आपला मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी महाड तहसीलदार यांनी दिव्यांग मतदार यांना मार्गदर्शन केले. तहसीलदार महेश शितोळे यांनी मनोगत व्यक्त करताना, प्रत्येकाने मतदान हे कर्तव्य समजून मतदानाचा हक्क बजावावा असे दिव्यांगांना मार्गदर्शन करताना सांगितले. तसेच लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मतदानाचा हक्क असून आपला हक्क बजावण्यासाठी प्रत्येकाने पुढे येऊन मतदान केले पाहिजे, असे आवाहन करताना दिव्यांग व्यक्तींना प्रत्येक मतदान केंद्रावर मतदानासाठी विविध मार्गातून सहकार्य मिळवून दिले जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर तहसीलदार महेश शितोळे, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष साईनाथ पवार, तालुका अध्यक्ष सुरेश पाटील, खजिनदार मुबिन देशमुख, सचिव अनिल जाधव, संस्था अध्यक्ष दीप्ती शेडगे यांच्यासह शेकडो दिव्यांग मतदार हजर होते.

## मतदानाला चला, तुम्ही मतदानाला चला | स्थलांतरित मतदारांची नेत्यांकडून मनधरणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नोकरी-व्यवसायानिमित्त शहरात गेलेल्याचाकरमान्यांनीगावाकडेयेऊनमतदान करावे, यासाठी नेतेमंडळी स्थलांतरितांची मनधरणी करू लागले आहेत. लोकसभेच्या रायगड मतदारसंघात एकूण १६ लाख ६८ हजार मतदार आहेत. यातील जवळपास चार लाख मतदारांनी बाहेरगावी स्थलांतर केले आहे. रोजगाराबरोबरच शिक्षण, रस्ते, आरोग्य या सारख्या नागरी सुविधांअभावी अनेकांनी आपली राहती घरे सोडून शहराचा रस्ता धरला आहे. इतरवेळी स्थलांतरित चाकरमान्यांची आठवण कुणालाही येत नाही, फक्त मतदानासाठी ‘दादा, मामा, काका, गावाकडे चला...’ अशी विनवणी नेतेमंडळी करू लागले आहेत.

रायगड लोकसभेसाठी सरासरी ६४ टक्के मतदान होते. यामध्ये विजयी उमेदवाराला



किमान पाच लाखांचा पल्ला गाठणे खूपच आव्हानात्मक असते. प्रत्येक मत महत्त्वाचे असल्याने प्रत्येक गटाला जवळ करण्याचा नेतेमंडळींचा प्रयत्न असतो. १६ लाख ६८ हजार मतदारांपैकी जवळपास सहा लाख नागरिक मतदानच करीत नसल्याचे याआधीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. यात शहरात राहणाऱ्या स्थलांतरित मतदारांचा भरणा जास्त आहे. हे मतदार मतदानासाठी गावी येण्याचे टाळतात. तिकिटाचा खर्च करून गावाकडे येणे अनेकांना शक्य होत नाही. ही समस्या ओळखून जिल्ह्यातील नेतेमंडळी या मतदारांना गावाकडे आणण्यासाठी खास बसची व्यवस्था करतात.

यंदा गुहागर, दापोली, महाड, श्रीवर्धन या मतदारसंघात ५० सीटच्या दोनशेहून अधिक बसची व्यवस्था करण्यात आली आहे. काहींची रेल्वेने येण्याची व्यवस्था करण्यात आली असून या मतदारांना गावाला मतदानाच्या दिवशी आणण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. प्रवास, जेवण, चहानास्ता असा लाखोंचा खर्च या अस्थायी मतदारांवर केला जाणार आहे. यासाठी स्थानिक नेतेमंडळी मतदारांच्या संपर्कात असून जास्तीत जास्त मतदारांना गावात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मुंबई, ठाणे, पालघर या ठिकाणांबरोबरच सुरत, बडोदा या ठिकाणी उद्योग-व्यवसायासाठी स्थलांतरित झालेल्या मतदारांमध्ये येथील राजकारण बदलण्याची क्षमता आहे. त्यांची भूमिका निर्णायक असल्याने दर निवडणुकीला काही आश्वासने दिली जातात; मात्र, निवडणुका संपताच त्यांच्याकडे कोणीही लक्ष देत नसल्याने जिल्ह्यात स्थलांतराचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची उणीव, रोजगाराची कमतरता, शिक्षणाच्या सुविधांची गैरसोय यामुळे ग्रामीण भागातील तरुणांचा शहरी भागाकडे कल वाढला आहे. मुख्यतः रोजगाराच्या शोधात गाव सोडून शहरी भागाकडे स्थलांतरित होणाऱ्या लोकसंख्येमुळे रायगड जिल्ह्यातील गावे ओस पडली आहेत.

### ग्रामीण लोकसंख्येत सातत्याने घट

**जिल्हा सांखिकी विभागाच्या माहितीनुसार, १९६१ च्या जनगणनेनुसार १० लाख लोकसंख्येपैकी फक्त एक लाख नागरिक शहरी भागात राहत होते. २०१६ मध्ये २५ लाख लोकसंख्येपैकी नऊ लाख नागरिक शहरी भागात राहत आहेत. ग्रामीण भागात १६ लाख राहत असून ही वाढ जवळजवळ दुप्पट आहे. म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, पोलादपूर, महाड या तालुक्यातील अनेक गावे ओस पडली आहेत. आताच्या निवडणुकीत जिल्ह्यातील ३० लाख २८ हजार लोकसंख्येपैकी २० लाख नागरिक शहरात राहतात, असा अंदाज आहे. तर या स्थलांतरामुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या १०० हुन अधिक शाळा विद्यार्थी नसल्याने बंद कराव्या लागल्या आहेत, तर १२१ बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.**

## भावा, तुझ्या पराभवाचा बदला घेणार!

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

गेल्या पाच वर्षांत राज्यात घडलेल्या अभूतपूर्व घडामोडींमुळे, दोन मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक होत असल्याने प्रचारात रंगत आली आहे. गेल्या निवडणुकीत आमनेसामने उभे ठाकलेले पक्ष आता विरोधात उभे आहेत.

महायुतीचे उमेदवार आणि शिंदेसेनेच्या तिकिटावर लढलेल्या बारणेंनी गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या पार्थ पवारांचा दारुण पराभव केला. हा पराभव पार्थ यांचे वडील अजित पवारांच्या जिव्हारी लागला. आता अजित पवार महायुतीत उपमुख्यमंत्री आहेत. गेल्या निवडणुकीत ज्या बारणेंचा विरोध केला, त्यांच्या प्रचारात आता अजित पवार दिसू लागले आहेत. यावरुन आ. रोहित पवारांनी त्यांच्यावर शरसंधान साधला आहे.

आम्ही विचार सोडलेले नाहीत. त्यामुळे आम्ही कालही बारणेंविरोधात लढलो आणि आजही लढत आहोत, असं म्हणत रोहित पवारांनी अजित पवारांना लक्ष्य केलं. मागील निवडणुकीत मावळमध्ये मी पार्थसाठी प्रचार केला. पण दुर्दैवानं त्यांचा मोठा पराभव झाला. बारणे विजयी झाले. लेकाचा पराभव करणाऱ्या बारणेंसाठी आता अजित पवार प्रचार करत आहेत. पण मी भाऊ म्हणून पार्थ यांच्या पराभवाचा बदला घेईन, असा निर्धार बोलून दाखवत रोहित यांनी अजित पवारांना टोला लगावला.

# कुठून येणार चारशे?

'अबकी बार चारसौ पार'चा नारा देणारे पहिल्या फेरीनंतर धापा टाकू लागले आहेत. गेल्या वेळी गुजरात, राजस्थान आणि हरियाणा या राज्यांमध्ये सर्व जागा भाजपला मिळाल्या होत्या. यंदा ते अशक्य आहे हे स्पष्ट आहे. हा जो घाटा येईल तो कुठून भरून काढणार असा प्रश्न आहे. त्यातच उत्तर भारतातील राजपूत समाजाने भाजपच्या विरोधात मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे. याची सुरुवात गुजरातेतून झाली. तेथे पुरुषोत्तम रुपाला यांनी क्षत्रिय किंवा राजपूत राजेरजवाड्यांविषयी अपमानास्पद वक्तव्य केले. इंग्रजांनी सर्व भारतीयांवर अत्याचार केले. इथल्या संस्थानिकांनी मात्र इंग्रजांशी जुळवून घेतले व काहींना तर आपल्या मुली दिल्या असे रुपाला म्हणाले. गुजरात व राजस्थानमध्ये एखाद्या तालुक्याच्या आकाराची शेकडो संस्थाने होती. याचे राजे क्षत्रिय किंवा राजपूत समाजातील होते. त्यामुळे तो समाज पेटून उठला आहे. गुजरातमध्ये जागोजागी निदर्शने चालू आहेत. रुपाला व भाजपच्या नेत्यांनी अनेकदा जाहीर माफी मागूनही परिणाम झालेला नाही. रुपाला यांची उमेदवारी रद्द करावी अशी त्यांची मागणी आहे. उत्तर प्रदेशामध्येही हे लोण पोचले आहे. तेथे मोदी आल्यापासून राजनाथसिंग यांना ज्या रीतीने कोपऱ्यात ढकलले आहे त्यामुळे मोठी नाराजी आहे. त्यातच यंदा माजी लष्करप्रमुख व माजी मंत्री व्ही.के. सिंग या ठाकूर समाजाच्या नेत्याचे तिकिट कापण्यात आले आहे. निवडणुकांनंतर योगी आदित्यनाथ यांना हटवले जाईल अशी अफवा पसरलेली आहे. यामुळे भाजपची त्या राज्यात तारांबळ उडाली आहे. राजस्थानमध्ये तर वणवा पेटला आहे. तेथे राजपूत हाच मुख्य समाज आहे. यावेळी भाजपला मतदान करायचे नाही असे जाहीर ठराव होत आहेत व निदर्शनेही होत आहेत. गेल्या चार दिवसांपासून राजस्थानात मोदींनी काँग्रेसवर खालच्या पातळीवर आरोप केले. हिंदू विरुध्द मुस्लिम असे वातावरण पेटवायचा प्रयत्न केला. राजपुतांच्या आंदोलनाचा चटका बसल्यानंतर मोदींनी सुरू केलेली ही धावाधाव आहे.

## दलितांमधील संताप

त्यातच मोदींना चारशेपार जागा मिळाल्या तर ते राज्यघटना बदलतील अशी भीती देशभरच्या दलितांमध्ये निर्माण झाली आहे. घटना म्हणजे या समुदायांसाठी शिक्षण, नोकरी व राजकारणातील आरक्षणाची हमी आहे. मोदी ती काढून घेतील असे दलितांना वाटू लागले आहे व ते स्वाभाविकही आहे. राखीव जागांच्या धोरणाचा आता फेरविचार करायला हवा अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच भाजपच्या अनेक नेत्यांनी गेल्या दहा वर्षात घेतली आहे. शिवाय, यंदा चारशे पार जागा मिळाल्या तरच घटना बदलणे शक्य होईल असे कर्नाटकातील भाजप नेते अनंतकुमार हेगडे यांनी सांगितले आहे. आरक्षण हे या समाजाच्या उत्थानाचा मार्ग आहे. शेकडो वर्षांच्या अस्पृश्यतेमुळे मागास राहिलेल्या या समाजाला गेल्या तीन-चार पिढ्यांमध्ये प्रगतीची दिशा सापडली ती आरक्षणामुळे. त्यामुळेच आज आयएएस, आयआयटी किंवा डॉक्टरकी इत्यादींमध्ये दलित समाजाची मुलेमुली मोठी भरारी घेऊ शकली आहेत. या आरक्षणावर भाजपच्या नेत्यांचा व भाजपला पाठिंबा देणाऱ्या भक्तांचा पूर्वापार राग आहे. मुस्लिमांबद्दल तर त्यांच्या मनात द्वेष आहे. तो व्यक्त केला तर आपल्याला हिंदूंची अधिक मते मिळतील असे मोदींना वाटते. पण ते खोटे आहे. सर्व हिंदू यांच्या भक्तांसारखे द्वेषाने आंधळे झालेले नाहीत. अयोध्येत राममंदिर बांधले गेले याचे अनेक हिंदूंना बरे वाटते. पण म्हणजे ते सर्व मुस्लिमविरोधी विचार करणारे व भाजपला मतदान करणारे असतात असे नव्हे. याचे प्रत्यंतर सध्या स्वतःला चाणक्य समजणाऱ्यांना येत आहे. राममंदिरामुळे निर्माण झालेल्या वातावरणामुळे नीतीशकुमार यांनी पुन्हा पलटी मारून भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला असे दोन महिन्यांपूर्वी सांगितले जात होते. आज बिहारमध्ये नीतीश यांचा सुपडा साफ होईल व भाजपच्या जागा कमी होतील असे चिन्ह आहे. तेजस्वी यांच्या राष्ट्रीय जनता दलाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

## पोकळ आत्मविश्वास

बिहारमध्ये तर सोडाच पण राममंदिराची कोणतीही लाट खुद्द उत्तर प्रदेशातदेखील दिसत नाही. हरियाणामध्ये तसेच पश्चिम उत्तर प्रदेशामध्ये जाट भाजपवर नाराज आहेत. शेतकऱ्यांचे आंदोलन भाजपने ज्या रीतीने दडपले त्यामुळे ही नाराजी आहे. म्हणजेच मध्य प्रदेश वगळता अन्य राज्यांमध्ये भाजपची गेल्या वेळच्या तुलनेत पीछेहाट होणार हे उघड आहे. महाराष्ट्राचे चित्र सर्वांसमोर आहे. येथे भाजपला मोठा धक्का बसेल असे भाकित आताच लोक करू लागलेले आहेत. दुसऱ्या फेरीचे मतदान व्हायची वेळ आली तरी शिंदे व भाजपला नाशिक, ठाणे, पालघर तसेच मुंबईतल्या जागा व उमेदवार ठरवता आलेले नाहीत. हीच स्थिती उत्तर देशातील अनेक जागांबाबत आहे. चारसौ पारचे दावे करणाऱ्यांचा आत्मविश्वास किती पोकळ आहे हे यावरून दिसेल. दक्षिणेमध्ये कर्नाटकात भाजपला थोडीफार आशा आहे. मात्र तेथे पक्षामध्ये मोठी बंडाळी माजली आहे. माजी उपमुख्यमंत्री इश्वरप्पा यांनी बंडखोरी केल्याने त्यांना पक्षातून काढून टाकण्याची वेळ आली आहे. अनेक नेते व खासदारांनी काँग्रेसचा हात पकडला आहे. खेरीज भाजपने विधानसभेत पराभूत झालेल्यांना तिकिटे दिल्याने पक्षातच नाराजी आहे. त्यामुळे कर्नाटकात गेल्या वेळइतक्या जागा मिळणे कठीण आहे. आंध्र, तेलंगणा, तमिळनाडू व केरळ येथे आपल्याला फार थारा मिळणार नाही हे भाजपलाही ठाऊक आहे. अशा स्थितीत काही प्रमाणात बंगाल, ओरिसा असे प्रदेश सोडले तर भाजपच्या जागा वाढण्याऐवजी कमी होण्याची शक्यताच अधिक आहे. त्यातच दलित व मुस्लिम मते निर्णायकरीत्या इंडिया आघाडीच्या बाजूने वळणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे चारसौ पार तर सोडाच पण बहुमतासाठी आवश्यक असलेले २७२ चे संख्याबळ जमवताना तारांबळ उडाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पहिल्या फेरीत मतदान कमी झाले आहे. सामान्य जनता मोदींच्या घोषणा आणि गॅरंटी यांना पुरती विटली आहे त्याचेच ते लक्षण आहे.

विचार

# जिंकण्यासाठी काहीही!



हेमंत देसाई

डॉ. आंबेडकर जयंतीच्या दिवशीच पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करून, आपले दिखाऊ संविधानप्रेम भाजपने प्रकट केले आहे! काँग्रेसचा जाहीरनामा हा मुस्लिम लीगच्या जाहीरनाम्याची आठवण करून देणारा आहे, असे अत्यंत विषारी वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. तर गेल्या निवडणुकीच्या वेळ काँग्रेस-राष्ट्रवादीचा जाहीरनामा म्हणजे जैशे महंमदचा जाहीरनामा आहे, असे बेछूट उद्गार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले होते.

काँग्रेसने जवानांचा अपमान केला. लष्कराकडे केवळ पैसे मिळवण्याचे साधन म्हणून पाहिले, असे वात्काडन मागे 'चौकीदारा'ने काश्मिरात केले होते. खरे तर काँग्रेसने सैनिकांचा कधी अपमान केला? जवानांचा आणि देशभक्तीचा निर्लज्ज व्यापार चौकीदारानेच मांडला आहे. काँग्रेसने संरक्षण खरेदीत भ्रष्टाचार केलाच, पण भाजप तरी कुठे मागे आहे? राफेलमधील कथित भ्रष्टाचार सिद्ध होऊ शकला नाही. पण मग बोफोर्समधील भ्रष्टाचार तरी कुठे सिद्ध झाला होता? इंदिराजींनी बांगलादेश युद्धावेळी, राजीवजींनी श्रीलंकेत फौजा धाडल्या, तेव्हा जवानांचा अवमान केला होता का? नेहरूंनी काश्मिरातून टोळीवाल्यांना हाकलण्यासाठी जवानांच्या तुकड्या धाडल्या, तो अपमान होता? लालबहादूर शास्त्री कोणत्या पक्षाचे होते? या 'नटसम्राटा'ने राजकीय चर्चेचा स्तर कुठे नेऊन ठेवला आहे? एक दिवस लोकच या प्रधानसेवकाला भर सभेत फैलावर घेतील. यांची सततची वटवट ऐकूनच 'आता ... सटकली,' अशी स्थिती होते!

काँग्रेस देशातील समाजघटकांमध्ये फूट पाडत आहे, असा आरोप नुकताच मोदींनी केला. दिल्ली, उत्तर प्रदेश वगैरे ठिकाणी भाजीवाल्यांमध्ये सुद्धा हिंदू-मुस्लिम असा भेदाभेद कसा केला जात आहे, याचे रिपोर्टिंग चॅनेल्सनी केले होते. मुस्लिम भाजीविक्रेत्यांकडून ग्राहकांना भाजी घेऊ द्यायची नाही, अशा भाजीवाल्यांना काठ्या मारायच्या, 'तुझे आधार कार्ड दाखव' अशी मागणी करायची - जणू काही स्वतः पोलिस आहोत, अशा थाटात दादागिरी करायची, हे हिंदुत्ववादी गुंडांकडून होणारे प्रकार करोनाकाळात वाढले होते. देशातील हे वातावरण भयानक आहे. आजही आपला देश द्वेषाच्या निखाऱ्यांवरून चालतोच आहे.

देशाच्या प्रगतीत प्रत्येक पंतप्रधानांचे योगदान आहे, हे नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन पटण्यासारखे आहे. परंतु काही पंतप्रधानांचे योगदान अधिक आणि काहींचे तुलनेने कमी आहे, हेही मान्य व्हायला हरकत नाही... आजवर खुद्द मोदीजींनी सर्वाधिक टीका नेहरूंवर केली आहे. त्यानंतर क्रमांक लागतो तो मनमोहन सिंग यांचा! भारताचे भाग्यविधाते म्हणून नेहरूंची कामगिरी, त्यांच्याबद्दल एखाद्याला कितीही द्वेष असला, तरी नाकारता येणार नाही. स्वत: मोदीजींनीदेखील काही चांगल्या योजना सुरू केल्या, हे सुद्धा मान्य केलेच पाहिजे. परंतु नोटाबंदी आणि जीएसटी यामुळे जीडीपीमध्ये ज्या क्षेत्राचा वाटा ३० टक्के इतका आहे आणि औद्योगिक निर्यातीत ज्या क्षेत्राचा हिस्सा ४० टक्के आहे, त्या लघुउद्योग क्षेत्राची धूळदाण उडाली, असे प्रत्यक्ष रिझर्व बँकेच्या अहवालातच नमूद करण्यात आले होते. देशात सहा कोटी लघुउद्योग असून, त्यामध्ये ११ कोटी लोक नोकऱ्या करतात. या रोजगारावर उपरोल्लेखित दोन गोष्टींचा विपरीत परिणाम झाला, हे रिझर्व बँकेने सांगितले होते.

राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत १९८८-८९ मध्ये भारताचा विकासदर १०.२ टक्के, असा विक्रमी राहिला. नॅशनल स्टॅटिस्टिकल कमिशनच्या एका समितीचा अहवाल नामवंत अर्थतज्ज्ञ सुदिप्तो मुंडले यांनी तयार केला होता. या अहवालात म्हटले होते की, राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत १९८८-८९ मध्ये भारताचा विकासदर १०.२ टक्के, असा विक्रमी राहिला. कोणत्याही पंतप्रधानाला अशी कामगिरी बजावत आली नव्हती व नाही. भाजपच्या दुर्दैवाने राजीव गांधी हे काँग्रेसमध्ये होते! राजीव राजवटीतच १९८८-८९ मध्ये शेतीचा विकासदर १५.४ टक्के इतका उच्च होता. राजीव गांधी हे पायलट होते आणि 'त्यांना देशाची ओळखदेखील नव्हती, त्यांना शेतीतले काहीही कळत नाही', अशी टीका भाजपच्या अनेक सर्वज्ञ नेत्यांनी केली होती, हे विशेष. मनमोहन पर्वाच्या पहिल्या चार वर्षांत ९.८३ टक्के, १०.०८ टक्के, ९.७९ टक्के आणि २०१०-११ या चौथ्या वर्षी ९.४२ टक्के अशा हनुमान वेगाने अर्थव्यवस्था धावली. त्या काळात काँग्रेसप्रणीत युपीए सरकारने हनुमान चालीसा किंवा हनुमान स्तोत्र म्हणण्याचा जाहीर कार्यक्रम हाती घेतला नव्हता, तरीदेखील पवनपुत्र हनुमानाच्या वेगाने आर्थिक प्रगती कशी काय झाली कोण जाणे! मनमोहन सरकारच्या दुसऱ्या टप्प्यात भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि आपल्या कलंकित प्रतिमेमुळेच ते सरकार गेले, हे नक्कीच. त्या सरकारच्या भ्रष्टाचाराचे समर्थन करण्याचे काहीच कारण नाही. परंतु २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात मनमोहन सरकारने सरासरी ८.१ टक्के या गतीने विकास साधला. २०१४ ते २०२० या मोदींच्या पहिल्या सहा वर्षांत जीडीपी वाढीचा सरासरी दर ६.८ टक्के होता. संकटे मनमोहन सरकारच्या काळातही कोसळली होती. उदाहरणार्थ जागतिक मंदी, तेलाचे प्रचंड वाढलेले भाव. उलट 'माझे नशीब चांगले असल्यामुळे मी सत्तेवर येताच तेलाचे भाव कमी झाले' असे मोदी म्हणाले होते. परंतु त्यामुळे त्यांचे व त्यांच्या पक्षाचे नशीब उजळले, देशाचे नव्हे. कारण इंधन दरवाढीबरोबरच सरकारने करवाढीची कुऱ्हाड चालवली. त्यात बेरोजगारी वाढली. मोदी पर्वापेक्षा मनमोहन पर्वातच अधिक गतीने विकास झाला आणि राजीव गांधींच्या पर्वात एका वर्षी सर्वाधिक गतीने प्रगती झाली, हे वास्तव आहे. हे दोन्ही नेते काँग्रेसचे. आता त्याला काय करणार! देशाचे पहिले पंतप्रधान नेहरू यांनी पंचवार्षिक योजना सुरू केल्या, नियोजन मंडळाची स्थापना केली. वैज्ञानिक संस्था, व्यवस्थापन संस्था, अणु व अवकाश संशोधनाचा पाया घातला. नेहरू काँग्रेसचेच. तरीही काँग्रेसने सत्तर वर्षांत देशाचे फक्त वाटोळे करण्याचे कामच मनोभावे केले, असे भाजपचे मत आहे! देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काँग्रेसने जे अभूतपूर्व काम केले, ते मुळात देशाचे वाटोळे करण्यासाठी केले होते, असे आपण मानून चालू या. कर्नाटकातील प्रतिपरमेश्वर, सद्गुणी, सद्वर्तनी, सदाचारी असे भाजपचे ज्येष्ठ मंत्री आणि माजी उपमुख्यमंत्री के. एस. ईश्वरप्पा यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून राजीनामा द्यावा लागला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल होऊनही, राजीनामा न देण्याची भूमिका म्हणे त्यांनी घेतली होती... भाजपमध्ये असूनही एखादा माणूस भ्रष्टाचार करू शकतो, यावर कोणाचाच विश्वास बसू शकत नाही. त्यांच्यावरचा हा आरोप खोटाच असणार. आणि तरीही चुकून तो खरा ठरलाच, तर माझ्या मते तरी, पूर्वजन्मात ते भ्रष्ट अशा काँग्रेस पक्षातच असतील! कर्नाटकातील भाजपचे बोम्मई सरकार ४० टक्के कमिशनवाले सरकार म्हणून कुप्रसिद्ध झाले होते. त्यावेळी 'पेसीएम' अशी पोस्टर्स काँग्रेसने राज्यभर लावली होती. तरीही आम्हीच स्वच्छ आणि बाकीचे अस्वच्छ, हा मोदी-शहांचा खोटा प्रचार सुरूच आहे. कथित भ्रष्ट नेत्यांना आपल्या पंक्तीत बसवून भाजपने 'जिंकण्यासाठी काहीही' हेच आपले नवे तत्त्वज्ञान असल्याचे दाखवून दिले आहे. 'उद्धव ठाकरे यांना चार ओळींचे पत्रदेखील लिहिता येत नाही', अशी जळजळीत टीका, आपल्या विद्वत्तेने त्रिखंडात कीर्तिमान असलेल्या कणकवलीच्या मुनीवरांनी केली होती. नारायण नारायण!

राहुल गांधींना नेहमीप्रमाणे अवतीभोवतीच्या परिस्थितीची माहिती नाही तसेच जणू काही कोरोनाचे संकट वाढावे अशी त्यांची इच्छा असावी असे भासते अशी टिप्पणी भाजप प्रवक्ते अमित मालवीय यांनी केली होती. हे मालवीय की 'माज'वीय? असा तेव्हा प्रश्न पडला होता. माध्यम प्रजासत्ताकाचे स्वयंघोषित सम्राट अर्णब गोस्वामी एका चर्चकावर 'तुमचे भुंकणे थांबवा' या शब्दांत खेकसले. ''तुम्हाला १० जनपथने पाळले आहे. शेपटी हलवणे थांबवा'', अशी अशोभनीय भाषाही त्यांनी केली होती. आपल्या 'प्रजासत्ताकात' आपण वाट्टेल तसे वागू शकतो, असा त्यांचा समज झाला आहे. केवळ नेतेच नव्हेत, तर मध्यमकर्मीही कसे बेबंदपणे वागतात, याचे हे उदाहरण. मागे, नामदाराने, म्हणजेच राहुल गांधींनी, ''चौकीदार चोर है'' म्हटले याचा अर्थ त्यांनी मागास समाजाचा अपमान केल्याचा अपप्रचार नटसम्राटाने अकलूजमध्ये केला होता. आपल्यावरील अस्त्र ते शिताफीने प्रतिपक्षावर उलटवतात. उपग्रहविरोधी क्षेपणास्त्र प्रधानसेवकाकडे आहेच! कुठल्याही गोष्टीचा फायदा कसा उठवायचा, ते नटसम्राटास बरोबर कळते. अदाणी प्रभृती उद्योगपतींनी म्हणूनच त्यांना गुरूमहाराज गुरू मानले आहे!

राहुल गांधी जामिनावर सुटल्याचा उल्लेख प्रधानसेवक आणि त्यांचे साजिंदे नेहमीच करतात. महान हिंदुत्ववादी क्रांतिकारक साध्वी प्रज्ञासिंह या तर बॉंबस्फोट प्रकरणातील आरोपी आहेत. मोक्कातील आरोपातून त्यांची सुटका झाली असली, तरी या प्रकरणी त्यांच्यावर इतर काही आरोप आहेतच. त्यांच्यावर अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट अंतर्गत अतिरेकी कारवाया, गुन्हेगारी कट रचणे वगैरेंबद्दल खटला भरण्याइतका पुरेसा पुरावा असल्याचे मुंबईच्या विशेष न्यायालयास आढळून आले होते. दुसरीकडे आरोपीबाबत सौम्य धोरण स्वीकारण्याबाबत माझ्यावर दबाव होता, असे विशेष सरकारी वकील रोहिणी सॅलियन यांनीदेखील म्हटले होते. तरीही २०१९ मध्ये साध्वी यांना लोकसभेच्या रिंगणात उतरवणाऱ्यांच्या प्रज्ञेला सलाम! आतादेखील नारायण राणे, अशोक चव्हाण, अजितदादा पवार यांच्यासारख्या कथित भ्रष्ट नेत्यांना आपल्या पंक्तीत बसवून भाजपने 'जिंकण्यासाठी काहीही' हेच आपले नवे तत्त्वज्ञान असल्याचे दाखवून दिले आहे.

**(इंडी जर्नलच्या सौजन्याने)**

आजकाल

# सुरतमधील बिनविरोध लढतीचे गूढ

गुजरातमधील सुरत लोकसभा मतदारसंघात काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. या मतदारसंघातून भाजपा बिनविरोध निवडून आली आहे. तर, या जागेवरील काँग्रेस उमेदवार ७२ तासांपासून बेपत्ता आहे. सुरत लोकसभेची जागा भाजपाच्या मुकेश दलाल यांनी बिनविरोध जिंकल्यापासून, काँग्रेसचे उमेदवार नीलेश कुंभानी बेपत्ता आहेत. विशेष म्हणजे, ते कुठे आहेत याची त्यांच्या पक्षालादेखील कल्पना नाही. भाजपाचे उमेदवार मुकेश दलाल निवडून आल्याची घोषणा झाल्यापासून कुंभानी यांच्यावर अनेक आरोप केले जात आहेत. ते भाजपात सामील होतील असेही सांगण्यात येत आहे. कुंभानी यांच्याच पक्षातील काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरावर बंडखोर असल्याची पोस्टर्स लावल्याचेदेखील आढळून आले आहे.

नीलेश कुंभानी पाटीदार आरक्षण आंदोलनादरम्यान प्रसिद्ध झाले होते. यंदा त्यांना काँग्रेसकडून सुरत लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी देण्यात आली होती. यापूर्वी कुंभानी यांनी महानगरपालिका निवडणुकीत विजय मिळविला होता. कुंभानी मूळचे अमरेली जिल्ह्यातील आहेत. त्यांनी सुरतमध्ये मोठा बांधकाम व्यवसाय उभा केला आहे. पाटीदार अनामत आंदोलन समितीचे नेते हार्दिक पटेल यांच्याशी असणाऱ्या जवळीकीमुळे ते राजकारणात सामील झाल्याचे बोलले जाते.

पाटीदार अनामत आंदोलन समितीचे नेते हार्दिक पटेल यांच्यासह कुंभानी यांनी २०१५ मध्ये सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात पाटीदारांना कोटा मिळावा यासाठी भाजपा सरकारविरोधात केल्या गेलेल्या आंदोलनात सक्रिय भूमिका बजावली होती. त्यांनी अंदाजे सहा लाख लोकांना जमवून भव्य सुरत सभेचे आयोजन करण्यास मदत केली होती; ज्यामुळे राज्यातील भाजपा सरकारने या विषयाची दखल घेतली.

पाटीदार अनामत आंदोलन समितीच्या नेत्यांनी सांगितले की, २०१७ ची विधानसभा निवडणूक कुंभानी यांना काँग्रेसच्या तिकीटावर लढवायची होती. परंतु, काँग्रेसला ते मान्य नव्हते. काँग्रेसने भाजपाकडून पूर्वी पराभूत झालेल्या पाटीदार समाजातील अशोक जिरावाला यांना उमेदवारी दिली. २०२१ मध्ये (कोविड काळानंतर) सुरत महानगरपालिकेच्या निवडणुका आल्या तेव्हा कुंभानी यांनी पुन्हा निवडणूक लढवली; पण त्यावेळी त्यांचा पराभव झाला.

पक्षाने त्यांना उमेदवारी का दिली, यावर सुरत काँग्रेसचे अध्यक्ष धनसुख राजपूत म्हणाले की, ''भाजपाने पाटीदाराला उमेदवारी दिली होती. सुरतमध्ये १८ लाख मतदारांपैकी ६.५० लाखांहून अधिक पाटीदार मतदार आहेत. आम्हाला नीलेश कुंभानी सक्षम वाटले. कारण- ते आर्थिकदृष्ट्या सुदृढ आणि त्यांच्या समाजात लोकप्रिय आहेत.''

कुंभानी यांनी लोकसभेच्या सुरत या जागेसाठी तीन उमेदवारी अर्ज भरले. नीलेश कुंभानी यांचे समर्थक म्हणून सह्या करणाऱ्या चार जणांपैकी तिघांनी त्यांच्या फॉर्मवर सह्या केल्या नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांचा अर्ज रद्द करण्यात आला. नीलेश कुंभानी यांचे समर्थक म्हणून सह्या करणाऱ्यांमध्ये त्यांचे मेहुणे जगदीश सावलिया, त्यांचे पुतणे ध्रुवीन धमेलिया व व्यवसायातील त्यांचे भागीदार रमेश पोलरा यांनी सह्या केल्या नाहीत

काँग्रेसच्या सूत्रांनी सांगितले की, कुंभानी यांचे कागदपत्र नाकारले गेल्यास आमच्याकडे पर्यायी उमेदवारदेखील होते. परंतु, कुंभानी यांच्याप्रमाणेच पर्यायी उमेदवार सुरेश पडसालादेखील बेपत्ता आहेत. काँग्रेस नेत्यांनीही ते बेपत्ता असल्याचे कबूल केले आहे. कुंभानीप्रमाणे पडसाला यांचाही अर्ज रद्द करण्याचा आदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून दिल्याचे वृत्त पीटीआयने दिले आहे. मतदान अधिकाऱ्यांना चारही प्रस्तावकांच्या स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत आढळून आली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक मनू सिंघवी यांनी दिल्लीत पत्रकारांना सांगितले, ''सुरतमध्ये नीलेश कुंभानी यांचे समर्थक म्हणून सह्या करणाऱ्या चारही जणांच्या सह्यांमध्ये तफावत आढळून आली आहे. हा योगायोग नाही. उमेदवार अनेक तास बेपत्ता आहेत.''

सुरत शहर काँग्रेसचे नेते व प्रवक्ते नौशाद देसाई यांनी सुचवले की, कुंभानी परत आल्यास पक्षाला अजूनही आशा आहे. भाजपाने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा गैरफायदा घेतला आहे. सुरतमध्ये जे घडले, ती बाब म्हणजे लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेची हत्या असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, ''नीलेश कुंभानी सुरत निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध गुजरात उच्च न्यायालयात गेले आहेत आणि येत्या काळात ते याचिका दाखल करणार आहेत. जर त्यांनी असे काही केले नाही, तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करू.''

लोकसंसद

## खारफुटीचे उपग्रह आधारित सर्वेक्षण महत्त्वाचे

महाराष्ट्राच्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारपट्टीवरील जिल्ह्यांमधील खारफुटीचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र मॅन्ग्रोव्ह सेलने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर या संस्थेला खारफुटीची वाढ आणि विनाश समजून घेण्यासाठी किनारपट्टीलगतच्या मॅन्ग्रोव्ह जंगलांचे उपग्रह आधारित सर्वेक्षण करण्यास सांगितले आहे. त्यासाठी मॅन्ग्रोव्ह सेलने ४.३६ कोटीची तरतूद केली असून सर्वेक्षण पूर्ण होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे. खरे तर किनारपट्टीची होणारी धूप आणि समुद्राची पातळी थोपवून धरण्याचे काम खारफुटीची झाडे करतात. तसेच ही खारफुटी नैसर्गिक भिंत बनून समुद्राचे पाणी भूभागात शिरण्याला प्रतिबंध करतात. वातावरणातील कार्बन डायऑक्साईडही खारफुटीची झाडे मोठ्या प्रमाणावर शोषून घेतात. खारफुटीच्या जंगलात अनेक समुद्री जीवांचे वास्तव्य असून पर्यावरणाच्या जैवसाखळीमध्ये खारफुटीच्या झाडांची अतिशय महत्वाची भूमिका आहे. विकास कामे, सांडपाणी वाहून जाणे, अतिक्रमण यासारख्या अनेक कारणांमुळे राज्यातील हजारो एकर खारफुटीचा अधिवास नष्ट झाला आहे. एकेकाळी ३२ हजार हेक्टरवर पसरलेली खारफुटी ३० हजार हेक्टरवर आली आहे. या पार्श्वभूमीवर खारफुटीचे हे सर्वेक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. **- राजेंद्र लकेश्री,** मुंबई

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**पंचवीस एप्रिल**

**१९१०:-** 'मराठी नियतकालिकांची सूची' हा तीन खंडांचा कोश तयार करणारे 'केसरी-मराठा ग्रंथशाळेचे' संस्थापक ग्रंथपाल शंकर नारायण बर्वे यांचा जन्म. नियतकालिकांनी १८६९-८२ जे प्रबोधनयुग मराठीत आणले त्याचा मागोवा बर्वेकृत सूचीमध्ये घेते. 'विनायकराव पटवर्धन जीवनदर्शन' हे चरित्र लिहिणाऱ्या बर्वे यांनी 'शारदामंदिर' आणि 'चूडामणी' ही संगीत नाटकेही लिहिली होती. इतिहासाच्या अभ्यासाचे साधन म्हणून नियतकालिकांना फार महत्व असते. एखाद्या कालखंडातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा कोणत्याही विचारप्रवाहांचा ठाव घेण्यासाठी अभ्यासकाला किंवा संशोधकाला ज्या काळातील नियतकालिकांचाच आधार घ्यावा लागतो. आपल्या विषयाशी संबंधित असलेले वाङ्मय शोधण्यात संशोधकांच्या वेळेचा आणि कार्यशक्तीचा अपव्यय होऊ नये यासाठी जुन्या आणि विद्यमान नियतकालिकांची आणि त्यातल्या लेखांची सूची उपलब्ध असणे आवश्यक आणि सोयीचे ठरते. म्हणून त्यांनी मराठी नियतकालिकांची सूची तयार केली. **१९२४:-** पेशाने डॉक्टर असूनही मराठी साहित्याचे दालन क्रिकेटविषयक लेखनाने सजवणारे लेखक डॉ.वसंत कृष्ण नाईक यांचा जन्म. 'अचेतन', 'आभास', 'यक्षप्रश्न' ह्या त्यांच्या शास्त्रीय कादंबऱ्या. याशिवाय 'कपिलदेव', 'बोथम', 'विजय हजारे' यांच्या चरित्रासह 'क्रिकेटचा खेळ' हा तांत्रिक माहितीविषयक ग्रंथ तसेच 'क्रिकेट वसंत', 'क्रिकेट सफर' यातून क्रिकेटविषयक लेख याशिवाय 'जागतिक क्रिकेटचा इतिहास', 'विजयी भारत', 'शतकवीर गावसकर' ही त्यांची आणखी काही क्रिकेटविषयक पुस्तके तसेच त्यांनी 'विजय हजारे', 'प्रा. दि. ब. देवधर या क्रिकेटपटूंच्या आत्मवृत्ताचे शब्दांकन केले. **१९२९:-** लेखक डॉ. विठ्ठलराव जीभकाटे यांचा जन्म. वयाच्या ७५ व्या वर्षी पी.एच. डी पदवी संपादन करणाऱ्या डॉ. विठ्ठलरावांची १५ हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये त्यांच्या आत्मचरित्रासह 'योग', 'निसर्गोपचार' या विषयांच्या पुस्तकांसह 'विद्यार्थ्यांशी हितगुज' हे शालेय, 'कर्मचारी, व्यापारी, अधिकारी यांच्याशी हितगुज हे माहितीपर, 'आरोग्यम धन संपदा' ह्या वैचारिक ग्रंथासह 'कृतार्थ', 'साठीच्या उंबरठ्यावर हा संपादीत चरित्रात्मक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. योगतज्ञ असणाऱ्या विठ्ठलरावांनी 'प्रौढांचे जीवन स्वास्थ्य आणि योगाभ्यास', 'योगासनांचे चार्टस्म', 'सूर्यनमस्कार', 'स्वानुभवातून योगाभ्यास' आदी ग्रंथ लिहिले. **१९४७:-** कथा, नाटक, बालकथा, बालनाटिका, काव्य, ललित आदी स्वरुपाचे लेखन करणाऱ्या लेखिका, कथाकथनकार अलकनंदा विजय गद्रे यांचा जन्म. आतापर्यंत 'निळे डोळे आणि दोन कथासंग्रह प्रकाशित. **१९७९ :-** कवी, कथाकार, समीक्षक लक्ष्मण महादेव भिंगारे यांचा जन्म ३० एप्रित १९२० रोजी झाला. सांगली व पुण्यातून शिक्षण पूर्ण केल्यावर 'हरिभाऊ' हा प्रबंध सादर करून त्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी संपादन केली. हरीभाऊ हा एकच प्रबंध त्यांनी लिहिला असला तरी साहित्य विश्वात साहित्यिक म्हणून नावलौकिक त्यांनी संपादन केला. तत्पूर्वी पुणे, कोल्हापूर, करमाळा, पाटण आदी ठिकाणी मराठीचे अध्यापन केले. हरिभाऊ हे चरित्रात्मक पद्धतीने ह.ना. आपटे यांच्या कादंबयांचा अभ्यास करणारा हा प्रबंध आहे. या प्रबंधातून भिंगारे यांनी हरिभाऊंच्या व्यक्तिमत्वात असणारे पराभूत आणि बंडखोर घटक त्यांच्या साहित्य निर्मितावर कसा प्रभाव गाजवतात तसेच त्यांच्या व्यक्तीमत्वातून त्यांची वाङ्मयीन भूमिका आणि त्यांच्या वाङ्मयीन भूमिकेतून त्यांचे व्यक्तीमत्व कसे प्रतिबिंबित होते यावर प्रकाश टाकली आहे. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या कविता शशिकला व एकसष्टी या काव्यसंग्रहात समादिष्ट आहेत. लवणाची मासोळी ही एक सामाजिक कादंबरी आणि बर्ट्रेंड रसेल पुस्तकाचा सामाजिक पुनर्रचनेची मूलतत्वे या नावाने अनुवाद केला. याखेरीज आत्र आणि राजनिती या ऐतिहासिक प्रबंधाचे संशोधन व संपादन त्यांनी केले. तथापि, हरिभाऊ अर्थात ह.ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास हे त्यांचे अतिशय मौलिक लेखन, २५ एप्रिल १९७९ रोजी त्यांचे निधन झाले. **१९८७:-** कवी 'प्रफुल्लदत्त' म्हणजेच दत्तात्रेय विष्णु तेंडुलकर यांचे निधन. पद्यकाव्य, रुबाई हे प्रकार त्यांनी हाताळले. कादंबरीका, नाटिका, चिंतनपर गद्य आदी लेखनही केले. एकंदर २७ पुस्तके झाली. 'अमृतसिध्दी' हे त्यांचे आत्मचरित्र १९८५ साली प्रसिध्द झाले होते. 'लाटा-लहरी' आणि 'चिंतनिकेची पाने (रुबाई)', 'गोमंतक व शिवस्वप्न (दीर्घकाव्य)', 'अशोकाची फुले', 'रेशमी लड्या' (गद्यकाव्य) हे त्यांचे काव्यसंग्रह उल्लेखनीय ठरले. **१९९९:-** पत्रकार आणि बालसाहित्यकार पंढरीनाथ रेगे यांचे निधन. कुमारवयीन मुलांसाठी गोष्टीची २३ पुस्तके त्यांनी लिहिली. यासाठी देशोदेशींच्या, प्रांतोप्रांतीच्या कथा धुंडाळल्या. रशियन कादंबरीकार लिओ टॉलस्टॉयच्या तीन दीर्घकथांचे त्यांनी छोटेखानी पुर्नकथन केले आहे. **२००९:-** साहित्य, नाट्य, चित्रपट, क्रीडा आदी क्षेत्रांचा व्यासंग असलेले बहुव्यासंगी नारायण मारुतीराव तथा ना. मा. कांबळे यांचे निधन. अत्रे यांच्या व्यक्तिमत्त्वावर यांनी लिहिलेले 'आचार्य अत्रे : एक बहुरंगी व्यक्तिमत्त्व' ह्या पुस्तकांशिवाय 'छोट्यांचे मोठेपण' या त्यांच्या पुस्तकालाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'नामा' नी १९४८ साली वर्तमानपत्रातून पत्रलेखनासाठी प्रारंभ केला. पुढे व्यक्तिपरिचय, प्रसंगविशेष लेखनही केले. कै.बाबुराव अक्कल, 'कै.रंगा वैद्य', 'प्रभाकर नूलकर ही मान्यवर संपादक मंडळी 'नामां'चे लेखन आपल्या वर्तमानापत्रासाठी आवर्जून मागवून घेत असत.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


# रो-रो रेल्वेतून गोव्यातील दारूची तस्करी?



- रोहा-कोलाडवर तपास यंत्रणांची वक्रदृष्टी
- मतदार संघात केली एक लाख लिटर दारु जप्त

**आविष्कार देसाई**

। रायगड ।

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग चांगलेच सतर्क झाले आहे. मतदारांना प्रलोभने दाखवण्यासाठी उमेदवारांकडून दारु-मटण पार्ट्यांचे आयोजन करणे हे काही लपलेले नाही. गोवा राज्यातून स्वस्तात दारु आणण्यासाठी काहींनी आता रेल्वेच्या रो-रो वाहतुकीचा आधार घेतला आहे. त्यामुळे रोहा-कोलाड येथे रो-रो रेल्वे सेवद्वारे येणाऱ्या वाहनांची पोलीस विभाग व रेल्वे प्रशासन यांच्याशी समन्वय साधून राज्य उत्पादन शुल्क विभाग तपासणी करणार आहे.

निवडणूक कोणतीही असली, तरी दारु-मटणाच्या पार्ट्या झोडल्याशिवाय मतदारांचा जीव शांत होत नाही. हा ट्रेड आता सर्वत्रच सेट झाला आहे. अशा पार्ट्यांना सुरुवात झाली आहे. निवडणूक विभागाचे पथक याकडे सोयीस्करपणे डोळेझाक करत असल्याचे दिसत आहे. लाखो लिटर दारुची विक्री होण्याचा अंदाज आहे. दारुच्या किंमती गोवा राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रात अधिक आहेत. त्यामुळे कमी खर्चात गोव्यावरुन दारु आणण्याची शक्यता उत्पादन शुल्क विभागाला वाटत आहे.

रोहा-कोलाड येथून ट्रकची वाहतूक केली जाते. अशा ट्रकमध्येच छुप्या पध्दतीने दारु आपल्या जिल्ह्यात आणली जाऊ शकते किंबहुना आणली गेली असलेही. यासाठी आता तपास यंत्रणांनी रस्तेमार्गे होण्याऱ्या तस्करीवर लक्ष ठेवतानाच रेल्वे वाहतुकीवर देखील लक्ष केंद्रीत केले आहे.

### एक लाख लिटर दारु केली जप्त

आचारसंहिता लागू झाल्यापासून १६ मार्च ते २२ एप्रिल २०२४ या कालावधीत एकूण २५७ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. संपूर्ण कारवाईमध्ये १ लाख १२ हजार ८७२ लिटर दारु आणि १३ वाहने जप्त केली आहेत. या प्रकरणी २५६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तब्बल ७१ लाख ८६ हजार ८४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक आर.आर.कोले यांनी दिली.

### मतदार संघात सात पथक तैनात

आचारसंहिता कालावधीत या विभागाची ७ पथके तैनात असून पथकांमार्फत आंतरराजीय मद्य तस्करी होणार नाही, याकडे नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच, बेकायदेशीर हातभट्टी दारु निर्मिती व विक्री केंद्र यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारची अवैध मद्य वाहतूक होणार नाही, याकरीता रायगड जिल्ह्यात शेडूंग (खालापूर), खारपाडा (पेण), चांदवे (पोलादपूर) असे ३ तपासणी नाके उभारण्यात आले असून तेथे संशयित वाहनांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. तसेच अवैध मद्यविक्री करणारे ढाबे, हॉटेल, टपऱ्यांवर वारंवार कारवाई करण्यात येत आहे.

### सराईत व्यक्तींविरोधात कारवाई

अवैध मद्याच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत व्यक्तींविरोधात महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम ९३ अंतर्गत एकूण २२१ प्रस्ताव लोकसभा मतदारसंघातील उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी १२३ कलम-९३ अंतर्गत बंधपत्र करुन घेण्यात आले आहेत. लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्यामुळे रायगड जिल्ह्यात एकूण १० मद्यविक्री अनुज्ञप्त्या पुढील आदेश होईपर्यंत निलंबित करण्यात आल्या आहेत.

### रायगडमध्ये १४५ गुन्हे

रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १४५ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ४५ लाख ३९ हजार ४१५ रुपये किंमतीचा मुद्देमाल व मावळ मतदारसंघात एकूण ११२ गुन्हे नोंद करण्यात आले असून २६ लाख ४७ हजार ४२६ किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १४९ खाली एकूण ५९६ संशयित व सराईत गुन्हेगारांना नोटीस बजाविण्यात आली आहे.

### येथे करा तक्रार

मतदारांना दारुचे प्रलोभन देत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्रीबाबत काही तक्रारी असल्यास या विभागाचा व्हॉटसअॅप क्र.८४२२००११३३, टोल फ्री क्र.१८००२३३९९९९ व अधीक्षक कार्यालय रायगड येथील दुरध्वनी क्रमांक ०२१४१-२२८००१ वर संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांची राहणार नजर

सर्व मद्य उत्पादक घटक, ठोक विक्री व किरकोळ विक्री अनुज्ञप्तीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता अनुज्ञप्त्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. तसेच सदरचे कंट्रोल रुम जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित करण्यात आले आहे.

# मेमध्ये १२ दिवस बँका बंद

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशातील विविध बँकांना विविध राज्यांकडून देण्यात येणाऱ्या शासकीय सुट्ट्या आणि शनिवार-रविवारची आठवडी सुट्टी धरून साधारण १२ दिवस मे महिन्यात सुट्टी असणार आहे. याबाबतची घोषणा रिझर्व्ह बँकेने केली आहे. तर, काही राज्यांमधील बँका निवडणुकांमुळं बंद राहणार आहेत. विविध महापुरुषांच्या जयंती आणि अक्षय्य तृतीयेसारख्या पर्वांनिमित्तही देशातील बऱ्याच राज्यांमधील बँका बंद राहतील, असेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, १ मे रोजी महाराष्ट्र दिन, कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, इंफाळ, कोची, कोलकाता, पणजी, पाटणा आणि तिरुवअनंतपूरम येथील बँकांना सुट्टी, ५ मे रविवार, ८ मे रविंद्रनाथ टागोर जयंती, कोलकाता येथील बँका बंद, १० मे- बसव जयंती, अक्षय्य तृतीयानिमित्त बंगळुरू येथील बँका बंद. ११ मे महिन्याचा दुसरा शनिवार, १२ मे रविवार, १६ मे राज्य दिनानिमित्त गंगटोक येथील बँकांना सुट्टी, १९ मे रविवार, २० मे लोकसभा निवडणूक, मुंबईतील बहुतांश बँकांना सुट्टी, २३ मे बुद्धपौर्णिमेनिमित्त बँका बंद, २५ मे नजरुल जयंतीनिमित्त काही राज्यांमध्ये बँकांना सुट्टी, २६ मे बँकांना रविवारची आठवडी सुट्टी असणार आहे.

# ‘जलसंजीवनी’मधून सिमेंट बंधाऱ्यांची दुरुस्ती

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात युनायटेड वे या संस्थेच्या माध्यमातून जलसंजीवनी अभियान राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून पाथरज ग्रामपंचायतीमध्ये तीन सिमेंट बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली. तालुक्यातील ११ गावांमध्ये मृदू आणि जलसंधारणाची कामे युनायटेड वे संस्थेच्या जलसंजीवनी अभियानामधून सुरू आहेत.



‘युनायटेड वे मुंबई’ संस्थेद्वारा कार्यान्वित आणि ओवेन्स कॉर्निंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारा अर्थ सहाय्यीत समग्र ग्रामविकास कार्यक्रम राबविला जात आहे.

कर्जत तालुक्यातील पाथरज आणि वारे ग्रामपंचायतीमधील ११ गावांमधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी तेथील जुन्या सिमेंट बंधाऱ्यांचे खोलीकरण, तसेच दुरुस्ती अशी कामे केली जात आहेत. जल आणि मृदा संधारण संबंधित कार्यावर प्रकर्षाने भर देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणजे, मागील वर्षी युनायटेड वे मुंबई संस्थेने पाथरज ग्रामपंचायतीमधील डोंगरपाडा या ठिकाणी तीन सिमेंट नाला बांध यांची दुरुस्ती करण्यात आली. त्यातील एका नाल्याचे खोलीकरण करण्यात आले, तर २६ अनघड दगडी बांध बांधले. त्यामुळे सभोवतालच्या जलस्त्रोतांमध्ये विशेषतः शेतकऱ्यांच्या विहीर पातळीत लक्षणीय वाढ झाली असल्याचे आढळून आले आहे.

या वाढलेल्या जलसाठ्याचा फायदा सात शेतकऱ्यांना झाला आहे. त्या शेतकऱ्यांनी त्या पाण्याचा वापर करून पहिल्यांदाच सुमारे २१ एकर क्षेत्रात रब्बी भाजीपाला लागवड केली. ज्यात बहुपीक पद्धत अवलंबली असून, मुख्य पीक काकडीसोबतच मिरची, टोमॅटो, वांगी, मुळा कोबी, मेथी, कोथमिर यांसारख्या पिकांचा समावेश आहे.

जल संजीवनी अभियानात उपक्रमात पाणी जरी विपुल प्रमाणात उपलब्ध झाले आहे.त्यामुळे त्या पाण्याचा मोकाट पद्धतीने गैरवापर न करता शेतकऱ्यांनी सुक्ष्मसिंचन प्रणालीद्वारे आवश्यक तेवढेच पाणी काटेकोरपणे वापरावे, असे आवाहन युनायटेड वे कडून करण्यात येत आहे. या भागातील शेतकरी गजानन लोहकरे यांनी प्रायोगिक तत्त्वावर पहिल्यांदाच कोबीची लागवड केली असून, त्यात त्यांना चांगला नफा झाला आहे. बाळू लोहकरे यांनी यावर्षी रब्बी पिकानंतर परत एकदा उन्हाळी काकडीची लागवड केली आहे. तर दरवर्षी भातपिकानंतर रिकामी असलेली जमीन यावर्षी मात्र तिन्ही हंगामात पिकांनी व्यापली गेली आहे. शेतकऱ्यांना त्याचा फायदा होताना दिसत आहे.

# पनवेलमध्ये बेसिक प्राणिक हिलिंग कार्यशाळा

। पनवेल । वार्ताहर ।

मैत्रेय प्राणिक हिलिंग सेंटर तर्फे बेसिक प्राणिक हिलिंग कार्यशाळा पनवेलमध्ये २७ व २८ एप्रिल या दोन दिवसांसाठी आयोजित केली आहे. या कार्यशाळेचे स्वरूप प्रशिक्षणाचे असल्यामुळे यामध्ये स्वतःचे व इतरांचे हिलींग, दूरस्थ हिलिंग,ऑरा व चक्र यांची माहिती, स्पर्श व त्यांचे परीक्षण करणे तसेच कर्माचा सिद्धांत यांसारख्या बऱ्याच गोष्टी शिकवल्या जाणार आहेत. ही कार्यशाळा वर्ल्ड प्राणिक हिलिंग फाऊंडेशनच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असून त्यांच्या अधिकृत प्रशिक्षकाद्वारे प्रशिक्षण देण्यात येईल.

### जाहीर नोटीस

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :-९१/२०२४

श्री. राजेश दामु थोरवे,
रा. गौरकामत ता.कर्जत जि.रायगड — अर्जदार

विरुध्द

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग, ता.खालापूर — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. भागुबाई सखाराम खांडेकर हे दिनांक २२/०३/१९९३ रोजी मौजे जांबरुंग ता. खालापूर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे जांबरुग ता. खालापूर जि. रायगड येथे राहत होते. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै.भागुबाई सखाराम खांडेकर यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत जांबरुग यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत मे.न्यायालय खालापूर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग यांना कै. भागुबाई सखाराम खांडेकर यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील याची दखल घ्यावी.

आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/-
**(आयुब तांबोळी)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**


### पुरवठादार पाहिजेत

पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई संचलित अनु. माध्यमिक रानपाखरं आश्रमशाळा वरप ता. पेण, जि. रायगड या शाळेच्या वसतीगृहासाठी ०१ जून २०२४ ते एप्रिल २०२५ या कालावधीसाठी खालीलप्रमाणे मालाचा पुरवठा करण्यासाठी व काही कामे करून देण्यासाठी इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहोत.

तरी इच्छुक पुरवठादारानी ही जाहिरात प्रसिद्ध झालेपासून कोटेशन १५ मे २०२४ पर्यंत बंद लिफाफ्यात पोस्टाने किंवा प्रत्यक्ष संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाठवावेत.

| अ.क्र. | मालाचा/कामाचा प्रकार | अंदाजे लागणार माल/काम |
|---|---|---|
| १ | तांदूळ, गहू | आवश्यकतेनुसार |
| २ | किराणा सामान, डाळी कडधान्य इ. | रू. १ लाख ते १.५ लाख रूपयांचा महिन्यासाठी |
| ३ | स्टेशनरी, लेखांसाहित्य | अंदाजे रू. २ लाख ते २.५ लाख रू. वार्षिक |
| ४ | भाजी/पालेभाजी | ३०० किलो प्रती आठवडा |
| ५ | फळे/केळी | गरजेनुसार नियमित |
| ६ | खोबरेल तेल साबण कोलगेट इ. | अंदाजे २५००० ते ३०००० रू. प्रती महिना |
| ७ | चिकन/मटन बोकडचे | ४० कि. ते ५० कि. प्रति आठवडा |
| ८ | अंडी | २५०० ते ३००० नग प्रति महिना |
| ९ | स्वीट पदार्थ | गरजेनुसार |
| १० | केसकटींग | गरजेनुसार |
| ११ | गहू दळण करून देणे | १० ते १२ क्विंटल प्रति महिना |
| १२ | स्वयंपाकाची भांडी | ताटे, ग्लास, वाटी गरजेनुसार |
| १३ | दूध | ४० ते ५० लीटर प्रती दिवस |
| १४ | पाव | ८०० नग प्रती आठवडा |
| १५ | बिस्किटे | अंदाजे १६०० प्रती महिना |
| १६ | गणवेश (युनिफॉर्म) | ११०० ते १२०० नग |
| १७ | इलेक्ट्रिक/पब्लिंग/कटलरी साहित्य | आवश्यकतेनुसार |

वरीलप्रमाणे प्रती महिना मालाचा पुरवठा गरजेप्रमाणे करावयाचा आहे.

टिप :-
१. पुरवठादार स्वतः उत्पादक किंवा विक्रेता असायला पाहिजे.
२. एकदा कोटेशन मंजूर झाल्यानंतर त्याच दराने वर्षभर मालाचा पुरवठा करावा लागेल. कोणत्याही वस्तूचे दर वाढवून मिळणार नाही.
३. माल उत्तम प्रतीचा व आवश्यकतेनुसार पुरवावा लागेल. खराब निकृष्ठ दर्जाचा माल स्विकारला जाणार नाही. आल्यास परत केला जाईल.
४. मालाच्या पुरवठ्यासोबत बील सादर करावे लागेल व त्याशिवाय माल ताब्यात घेतला जाणार नाही.
५. पुरवठा केलेल्या मालाचे बील अनुदान प्राप्त झाल्यानंतर चेकने अदा केले जाईल.
६. वरील दरपत्रकांपैकी दरपत्रक स्विकारणे वा नाकारणेचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.
७. प्रत्येक १ ते १७ बाबी करीता स्वतंत्र व वेगवेगळे दरपत्रक सादर करावे.

**पत्ता : पवार पब्लिक चॅरिबेटल ट्रस्ट संचलित अनुदानित माध्यमिक रानपाखरं आश्रमशाळा पबळखोरे मु. वरप, ता. पेण, जि. रायगड**

**संपर्क : ९०१११९८०७४, ८८८८२६०७३४**


## अग्निशमन सेवा सप्ताह २०२४ मध्ये
# सिडको अग्निशमन दलामार्फत जनजागृती



। पनवेल । वार्ताहर ।

कराचीहुन मुंबई बंदरात आलेल्या फोर्ट स्ट्रीकीन नावाच्या बोटीमधील स्फोटकांमधे स्फोट होऊन १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात प्रचंड मोठी आग लागली होती. ही आग विझवताना अग्निशमन दलातील ६६ हुन अधिक जवान धारातीर्थी पडले होते. अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनवृत्ती टाळण्यासाठी अग्निशमन ह्या विषयाची जनजागृती करण्याकरता १४ एप्रिल ते २० एप्रिल हा सप्ताह अग्निशमन सेवा सप्ताह म्हणून संपूर्ण देशात पाळला जातो.

२०२४ अग्निशमन सेवा सप्ताहाकरीता केंद्र शासनातर्फे अग्नि सुरक्षा सुनिश्चित करा, राष्ट्र उभारणीत योगदान भरा घोष वाक्य अंतिम करण्यात आले आहे. घोष वाक्य सार्वजनिक जागांवर सिडको महामंडळाच्या अग्निशमन विभागामार्फत लावण्यात आले तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी, विजय राणे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, प्रविण बोडखे व अग्निशमन केंद्र अधिकारी, प्रतिक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण सप्ताहात जनजागृती कार्यक्रम, मॉकड्रील घेण्यात आले. कळंबोली अग्निशमन केंद्र येथे शहिद जवानांना श्रध्दांजली देवून सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. उलवे येथील मेसर्स स्काय अव्हेन्यु, सेक्टर ९, या रहिवासी इमारतीत जनजागृती पर व्याख्यान व प्रात्यक्षिक देण्यात आले. उलवे येथील मेसर्स काम धेनु ऑकलॅण्ड, सेक्टर १०बी, या रहिवासी इमारतीत जनजागृतीपर व्याख्यान व प्रात्यक्षिक देण्यात आले. जासई येथील, जिल्हा परिषद शाळेत, उरण येथील मेसर्स ट्रान्स वर्ल्ड लॉजिस्टीक, वेश्वी येथे, मेसर्स जे. एम. बक्षी कंपनीमध्ये जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. उरण येथील मेसर्स इंडियन ऑईल अदानी वेन्चर नवघर येथे जनजागृती प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आले.

### पोलिसांनी मानले नागरिकांचे आभार

। पनवेल । वार्ताहर ।

मार्च-एप्रिल या महिन्यामध्ये आलेले सर्व सार्वजनिक उत्सव-सण शांततेत पार पाडल्याबद्दल पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी सर्व नागरिकांचे आभार मानले आहेत. यंदा मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यात सर्व धर्मियांचे सण आल्याने यासंदर्भात पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावातील पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच, पंच कमिटी, उत्सव कमिटी (शहरी व ग्रामीण), ग्रामस्थ व शांतता कमेटी यांची बैठक आयोजित केली होती. व सर्वधर्म नागरिकांनी गुढीपाडवा, रमजान ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम नवमी, महावीर जंयती व श्री हनुमान जयंती हे सर्व सण-उत्सव शासनाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे विहित वेळेत व शांततेत पार पाडले.

# माथेरान पर्यटनस्थळाच्या विकासाला ब्रेक?

। माथेरान । वार्ताहर ।

अनेक वर्षांपासून नावाजलेल्या माथेरान पर्यटनस्थळावर पहिल्यांदाच मागील दोन महिन्यांपासून तीव्र मंदीची झळ स्थानिकांना सोसावी लागत आहे त्यामुळे इथे जी काही थोड्याफार प्रमाणात विकासकामे मार्गी लागली आहेत आणि अजूनही काही कामे पूर्णत्वाकडे जाताना दिसत आहेत.

पर्यटकांना अभिप्रेत असणाऱ्या सोयीसुविधाचा अभाव त्याचप्रमाणे काही व्यावसायिक यांच्याकडून दिशाभूल होऊन पर्यटकांचा एकप्रकारे खिसा रिकामा करण्यासाठी प्रयत्न केला जाणाऱ्या व्यावसायिक यांच्यामुळे इथे पर्यटक फिरकत नाहीत की ह्या गावाला विकासाच्या प्रवाहात आणताना काही विघ्नसंतोषी लोकांमुळे खोडा घातला जात असल्याने महत्वपूर्ण विकास कामे जलदगतीने मार्गी लागत नाहीत. काळानुसार पर्यटन वाढीसाठी आवश्यक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. परंतु, स्वतःच्या व्यवसायासाठी गावाच्या विकास कामांना खोडा घालून एकप्रकारे ठेकेदाराला वेठीस आणून आपल्या पदरात चिरीमिरी पाडून घेण्यासाठी काही मंडळी याबाबत निष्णात आहेत. परंतु यामध्ये नकारात्मक धोरणामुळे हे छोटेसे गाव प्रगती पासून खूपच दूर फेकले जात आहे. सद्यस्थितीत इथे पर्यटकांचा भरणा अल्पप्रमाणात दिसून येत आहे. ज्यांची हातावर कमाई आहे अशा लहान स्टॉल्स धारकांना, तसेच मोलमजुरी करणाऱ्या श्रमिकांना मंदीचा सामना करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मुंबई पुण्यापासून अगदी जवळ असणाऱ्या याठिकाणी वर्षाचा सुट्ट्यांचा शेवटच्या एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत प्रथमच तीव्र मंदी आल्यामुळे वाढत्या महागाईला तोंड देताना महिला वर्गाला त्रासदायक

पान १ वरुन

### ३००८ मतदार करणार गृहमतदान

आहेत, याची नोंद घेण्यात आली. त्यानुसार ८५ ते ११९ वर्षांवरील २८ हजार २२७ मतदारांनी आम्ही मतदान केंद्रांवर येऊनच मतदान करणार असल्याचे सांगितले. तर बहुतेक दिव्यांग मतदार देखील मतदानाच्या दिवशी केंद्रांवर येतील अशी स्थिती आहे. ज्या मतदारांना केंद्रांवर यायला वाहनाची सोय नाही, त्यांनी मागणी केल्यास त्यांच्यासाठी शासनाकडून वाहने उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

### रिक्षा-पिकअप अपघातात महिलेचा मृत्यू

पुष्पा संतोष पवार, राजेश राम वाघे हे तीन जण जखमी झाले. तसेच मानसी मोहन वाघे यांच्या डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यु झाला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धोंडे अधिक तपास करीत आहेत.

### कर्नाटक सरकारचे मुस्लिमांना ओबीसीतून आरक्षण!

१७ मुस्लिम समुदायांना ओबीसी ठरवण्यात आलेलं आहे. तर श्रेणी २ ए मध्ये १९ मुस्लिम समुदायांना ओबीसी ठरवण्यात आलेलं आहे.एनसीबीसीचे अध्यक्ष हंसराज गंगाराम अहीर यांनी सांगितलं की, कर्नाटक सरकारमधील नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी मुस्लिमांना आरक्षण मिळणार आहे. कर्नाटक सरकाच्या मागास कल्याण विभागाने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला लिखित स्वरुपात याबाबत अवगत केलं होतं. कर्नाटकमध्ये मुस्लिमांची लोकसंख्या १२.९२ टक्के आहे. राज्यात मुस्लिमांना धार्मिक अल्पसंख्यक मानलं जातं. २०११च्या जनगणनेनुसार कर्नाटक राज्यात मुस्लिमांची लोकसंख्या १२.३२ टक्के आहे.

### उद्यानातील पालापाचोळ्याचे होणार विघटन

हा कालावधी कमी करण्याच्या हेतूने पालिका प्रशासनाकडून खारघर येथील सेक्टर १२ मधील भूखंड क्रमांक १, कळंबोली सेक्टर ६ ई येथील भूखंड क्रमांक २, कामोठे सेक्टर २० येथील भूखंड क्रमांक २८+३५+३६ तसेच नवीन पनवेल सेक्टर ६ येथील भूखंड क्रमांक ९ अशा चार ठिकाणी वुड श्रेडिंग मशीन लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**वुड श्रेडिंग मशीनचा फायदा**

उद्यानात गोळा होणारा पालापाचोळा एकत्र करून वुड श्रेडिंग मशीनमध्ये त्याचा भुसा तयार केला जाणार आहे. त्यानंतर हा भुसा खत कुंड्यामध्ये जमा केला जाणार आहे. अविघटित पालापाचोळ्यापेक्षा भुशाचे विघटन वेगाने होत असल्याने अत्यंत कमी कालावधीत उद्यानातच खत निर्मिती करणे सोपे होणार आहे.

### सत्तेत आल्यास कर्जमाफी

या देशात संपत्तीची कमी नाही. तुम्ही देशातील अब्जाधीश उद्योगपतींकडे बघा, त्यांचं घर, गाड्या बघा. ते पाहून आपल्याला लक्षात येईल की, देशात संपत्तीची बिलकूल कमी नाही. जर अब्जाधीश उद्योगपतींचं कर्ज माफ होऊ शकतं, तर गरिबांचं कर्जही माफ झालं पाहिजे. केंद्र सरकार उद्योगपतींचं कर्ज माफ करतंय, मग शेतकऱ्यांचं कर्जही माफ झालेच पाहिजे. अन्यथा देशात कोणालाही कर्जमाफी करता कामा नये, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

### मतदान यंत्रांवरुन ‘सर्वोच्च’ चर्चा

किंवा त्यात काही गडबड केल्याची एकही घटना घडलेली नाही. निवडणूक आयोग ही स्वतंत्र संस्था आहे. त्यावर आमचं नियंत्रण नाही. काही सुधारणा हव्या असतील तर आम्ही त्या सुधारा हे सांगू शकतो.न्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, आम्ही निवडणूक आयोगाला दुसरा प्रोग्राम या ईव्हीएममध्ये फीड केला जाऊ शकतो का? हे विचारलं होतं. त्यावर निवडणूक आयोगाने असं काहीही होऊ शकत नाही, असं म्हटलं होतं. फ्लॅश मेमरी प्रोग्राममध्ये निवडणुकीला उभे राहिलेल्या उमेदवारांची चिन्हं असतात. बाकी काहीही नसतं. तांत्रिक बाबींवर आपल्याला विश्वास ठेवावा लागेल.

### श्रीवर्धनच्या खाडीत आढळला समुद्री घोडा

कांदळवन प्रतिष्ठानाचे सहाय्यक संशोधक मोहन उपाध्ये यांना दिली. त्यांनी या समुद्री घोड्याची पाहणी करुन फणसोपकर आणि विक्रांत गोगरकर यांच्या मदतीने पुन्हा त्याला खाडीत सोडले. या समुद्री घोड्याची लांबी १३ सेमी होती. समुद्री घोडा हा भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत संरक्षित असून त्याला वाघाला ज्या प्रकारे संरक्षण आहे, तसेच त्यालाही देण्यात आले आहे.

समुद्र घोड्याचा आकार इंग्रजा ‘एस’ अक्षराप्रमाणे असतो. मासा या प्रकराता तो मोडत असला,तरी तो माशासारखा दिसत नाही. शास्त्रीयदृष्ट्या हा जलचर हिप्पोकॅम्पस या गटातील आहे. तो बॉनी प्रकारातील मासा असून त्याच्या पन्नासहून अधिक प्रजाती आहेत. माशा प्रमाणे त्याच्यावर खवले आढळून येत नाहीत. समुद्र घोडे हे उभे पोहतात. समुद्र घोड्याची उत्क्रांती ही पाइप माशापासून झाल्याचे शास्त्रज्ञाचे म्हणणे आहे.

# रायगडात बजरंगबलीचा जयघोष

## बार्डी गावातील हनुमंताच्या दोन मूर्तींचे कुतूहल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील बार्डी गावांमधील बजरंग बली हनुमंताच्या मंदिरात दोन हनुमंताच्या मूर्ती आहेत. गावातील एकाच मंदिरात दोन हनुमंताच्या मूर्ती असल्याने उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, बार्डी या गावाला आग लागल्यानंतर गावातील हनुमंताच्या मूर्तीचे नुकसान होऊ नये म्हणून उल्हास नदीच्या पाण्यात ठेवून देण्यात आली होती. या घटनेनंतर मंदिरात नवीन मूर्ती स्थापित करण्यात आली होती.



कर्जततालुक्यातीलचिंचवलीगावातील बार्डी गावच्या मंदिरात हनुमंताच्या दोन मूर्ती आहेत. एकाच मंदिरात दोन मूर्ती कशा, असा प्रश्न आजच्या पिढीला पडला आहे. एक मूर्ती गावची व एक मूर्ती सोनारांची असे सांगितले जात आहे. सन १९४० ते स्वातंत्र्य पूर्व काळात बार्डी गावाला आग लागली होती. त्या काळात गावातील घरे लाकडाची तर काही काही कुडाची होती. त्यामुळे लागलेली आग गावभर पसरली आणि त्याची झळ मंदिराला देखील बसली. ग्रामस्थांनी मंदीरातील बजरंग बलीची मूर्ती गावाच्या बाजूने वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पाण्यात नेऊन ठेवली. त्यानंतर काही दिवसांनी ग्रामस्थांनी पुन्हा आपली घरे बांधली पण अनेक महिने मंदिरात मूर्ती नव्हती. मूर्ती विना मंदिर ही संकल्पना योग्य नसल्याने बाबुराव बापु निघोजकर आणि हरींश्चद्र बापु निघोजकर या सोनार बंधूनी आपल्या खर्चाने नवीन मूर्ती आणि रामाच्या पादुका आणल्या आणि त्यांची विधीवत प्राणप्रतिष्ठा करुन मारुतीरायाची स्थापना केली.

परंतु काही महिने गेल्यावर गावातील काही जेष्ठ लोकांना गावाला आग लागली त्यावेळी उल्हास नदी मध्ये ठेवलेल्या हनुमंताने दृष्टांत दिला. नदीतील मारुतीराया ग्रामस्थांच्या स्वप्नात येऊ लागला आणि मलाही मंदिरात यायचे आहे, असे सांगून पाण्यात राहायचे नाही असा हट्ट धरला. मग ग्रामस्थांनी एक शुभ दिवस पाहून सन्मानाने उल्हास नदीमधील मूर्ती पाण्यातून बाहेर काढली आणि तेथे श्रीफळ वाढवून मारुतीरायांना पुन्हा मंदिरात वाजतगाजत आणले. तेथे विधीवत पूजा करुन सोनार कुटुंबीयांनी आणलेल्या मूर्तीच्या बाजूला दुसरी जुनी मूर्ती स्थापित केली. तेंव्हापासून बार्डी गावात मोठ्या भक्तिभावाने पूजा, हनुमान जयंती आणि पालखी सोहळा मोठ्या आनंदाने उत्सव साजरा होतो.

मध्यांतरी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला, त्या वेळेस २०१३ साली मंदीर बांधकाम चालू असताना एक वानर मंदिराजवळ आले आणि नंतर पूर्ण गावभर फिरले. शेवटी मंदिराच्या कळसावर जाऊन बसले. त्यावेळी ग्रामस्थांनी खाण्यासाठी फळे दिली आणि त्यानंतर रात्री ते वानर गावातून नाहीसे झाले. त्यामुळे बार्डी गावातील मारुतीराया जागृत समजला जातो.



● हनुमान जयंतीनिमित्त अलिबाग मधील चेंढरे येथील श्री हनुमान मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती



● श्री हनुमान जयंती निमित्त पनवेलच्या सुप्रसिद्ध पंचमुखी हनुमान मंदिरात दर्शनाकरीता सकाळपासून रांगा लावल्या होत्या. तसेच, भक्तांकरीता महाप्रसादाचे आयोजन केले होते.





● हनुमान जयंतीनिमित्त खारआंबोली व तेलवडे येथील महिलांनी पाळणा गीत गात उत्सव आनंदात साजरा केला. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## मुरुडमध्ये हनुमान जयंती उत्साहात

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

शेकडो वर्षांची परंपरा असणारा मुरुड तालुक्यातील खारआंबोली या गावत हनुमान जयंती उत्साहात पार पडली. पहाटे ६ वाजता गावच्या देवळात जन्मकाळ होताच सर्वंनीच जल्लोष केला.

तरुणांनी काठी हातावर घेत देवळाभोवती फिरवायला सुरुवात केली. देवळात घंटानादात करण्यात आला. तसेच महिलांनी पाळणा गीत गायले.

दरवर्षी म्हदेवावची काठी तरुण बलदंड युवक उचलण्याची प्रथा आहे. ती काठी खूप उंच व जड असल्याने ४ जण काठीला दोरी बांधून तोल सांभाळण्याचे काम करतात. ही प्रथा सुरु राहावी म्हणून यावर्षी लहान मुलांनी छोटी काठी बनवून तिला रोषणाई करून देवळाभोवती फिरवली. यावेळी ही लहान मुले यात्रेचे प्रमुख आकर्षण बनले.

रात्री १२ वाजता येथे मारुतीरायांची गावातून पालखी निघाली. त्यामध्ये खार आंबोलीच्या वीर बजरंग व्यायाम शाळेचे व्यायामपटू दांडपट्टा, मल्लखांब, लाठी, काठी असे शारीरिक कसरतीचे प्रयोग सादर केले.



● पनवेल-रसायनी मार्गावरील आपटा येथील रस्त्यावर असलेले हनुमानाचे भव्य मूर्तीरूपे मंदीर येथे श्री हनुमान जयंती निमित्त सकाळ पासून भक्तांनी दर्शनाकरीता गर्दी केली होती.

## हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील गणपती चौक येथील हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा उत्सव श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ उरण यांच्यावतीने साजरा करण्यात आला.

पहाटे विलास कर्वे यांचे किर्तन, सकाळी श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळाचे भजन, दुपारी महाप्रसादाचे आयोजन, सायंकाळी भजन व पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी रेखा पाटील, रोहित पाटील, मधुकर नाईक, भालचंद्र म्हात्रे, जगदीश भोईर, मनोज म्हात्रे, विपुल पारेख, नितीन वर्तक, निर्मला ममताबादे, विठ्ठल ममताबादे उपस्थित होते.

## चेंढरे येथे हनुमान जन्मोत्सव साजरा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

हनुमान जयंती निमित्त चेंढरे-अलिबाग ग्रामस्थ मंडळ आणि मारुती देव चँरिटेबल ट्रस्ट आयोजन श्री हनुमान पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. चेंढरे येथील श्री हनुमान जन्मोत्सव निमित्ताने मंदिरात सकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत श्री हनुमानाची विधिवत पुजा,



महाआरती, श्री सत्यनारायणाची महापुजा तसेच भाविकांसाठी महाप्रसाद आदींचे आयोजन करण्यात आले होते.

चेंढरे विभागातील मानाची पालखी सोहळ्या दरम्यान अलिबागचे माजी नगराध्यक्ष मा. प्रशांत नाईक तसेच अन्य जेष्ठ मान्यवरांना शाल व टोपी देऊन सन्मानित करण्यात आले. चेंढरे-अलिबाग ग्रामस्थ मंडळ आणि मारुती देव चँरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने श्री हनुमान जयंती पालखी सोहळा पार पडला.



● खांदा वसाहतीच्या श्री हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त सकाळपासून भक्तांनी दर्शनाकरीता रांगा लावल्या होत्या.

## वानिवली येथील कारखान्याला भीषण आग

**। खोपोली/रसायनी । प्रतिनिधी ।**

वडगांव हद्दीतील वानिवली येथे असलेली एस.एच.केलकर या कंपनीच्या गोडाउनला मंगळवारी (दि.२३) सांयकाळी सव्वापाचच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. या कंपनीत विविध प्रकारचे सेंट (अत्तर) निर्माण होत असून या आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच, या आगीच्या धुराचे लोट दहा ते बारा कि.मी.पर्यंत पसरले होते.



सुरुवातीला ही आग अल्प प्रमाणात लागली होती. काही वेळातच या आगीने रुद्ररूप धारण केले. यामुळे कंपनीतील व्यवस्थापकांची तारांबळ उडाली. आगीवर नियंत्रण आणणे अवघड झाले होते. या कंपनीत जवळपास ३५० कामगार काम करीत असून सर्व कामगार साडेचारला सुट्टी करुन बाहेर पडले होते. फक्त सात ते आठ कामगार कंपनीत होते. तेही सुखरुप बाहेर पडले. तहसिलदार आयुब तांबोळी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ परिसरातील अग्निशामक दलाच्या जवानांना पाचारण केले. अग्निशामक दलाच्या जवानांच्या अथक परिश्रमानंतर काही तासानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. या कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असले तरी कोणतीही जिवितहानी झाली नाही. आगीचे नक्की कारण काय, हे मात्र समजू शकले नाही. या परिसरात शेकडो कारखाने असून सातत्याने कोठेतरी आग लागण्याच्या घटना घडत असल्याने नागरिक भयभीत आहेत.

## पत्नीची पतीविरोधात तक्रार

### ■ पासपोर्टवर खोटी नोंद

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील मुमताज इमरान कासकर या महिलेने आपल्या पती विरोधात तक्रार केली आहे.

पत्नीने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे कि, माझे पती इमरान शरफुद्दीन कासकर यांनी सन २०१६ मध्ये त्यांनी परदेशात नोकरीनिमित्त जाण्यासाठी नविन पासपोर्ट बनविला होता. पासपोर्टचा फॉर्म भरताना त्यांनी विवाहीत असतानाही अविवाहीत असल्याचे नमुद केले. पासपोर्ट मिळाल्यावर पती नोकरीनिमत्त दुबई येथे गेले, त्यांनतर त्यांनी मला व माझ्या ३ मुलांशी कोणताही सबंध ठेवलेला नाही. ज्या कंपनीमध्ये ते काम करीत आहेत तेथे त्यांनी अविवाहीत आहेत, असे सांगितलेले आहे. तसेच, पासपोर्टवर त्यांनी आई, वडील यांचे नाव दाखवले आहे. पासपोर्ट फॉर्म भरताना जे दोन ओळखीचे पुरावे द्यावे लागतात. त्या दोन साक्षीदारांनी खोटी साक्ष दिली आहे.

पासपोर्ट मुरुड पोलीस ठाणे येथे चौकशी करीता आले असता या तिघांनी संगनमत करुन पोलीसांना अविवाहीत असल्याची खोटी माहीती दिलेली आहे.

या चारही व्यक्तींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा व पासपोर्ट तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. रायगडचे पोलीस अधीक्षक व संबंधित पासपोर्ट विभागाने तक्रारीची दखल घेऊन याप्रकरणी योग्यती कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.



## पाणीटंचाई भागात बोअरवेल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कळंब ग्रामपंचायतमधील दोन ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असल्याची माहिती सामाजिक संस्थेला मिळाली होती. त्याच्या माध्यमातून रामचंद्र बदे यांच्या प्रयत्नाने भगूची वाडी आणि नवीन देवपाडा अशा दोन ठिकाणी बोअरवेल खोदण्यात आल्या.

तालुक्यातील कळंब ग्रामपंचायतीमध्ये नळपाणी योजनेचे काम रखडले आहे. त्यामुळे कळंब ग्रामपंचायतीमधील काही भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तात्काळ बोअरवेल खोदणारी मशीन पाठवून देण्यात आली. त्यानंतर भागूची वाडी, नवीन देवपाडा या दोन्ही ठिकाणी बोअरवेल खोदून देण्याचे काम पुर्ण करण्यात आले. त्यामुळे येथील नागरिकांची पाण्याची समस्या काही प्रमाणात सुटली आहे.

## नवे शैक्षणिक धोरण

**पुणे :** मराठी विज्ञान परिषदेचा ५८वा वर्धापन दिन, रविवारी (दि.२८) मुंबईतील चुनाभट्टी येथील मराठी विज्ञान परिषदेत साजरा होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुनील भागवत (संचालक, आयसर, पुणे) नवीन शैक्षणिक धोरणाविषयी विचार मांडतील. या कार्यक्रमात सु.त्रिं. तासकर पुरस्कार, सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार, मनोरमाबाई आपटे पुरस्कार, विज्ञान संशोधन पुरस्कार, कृषी पुरस्कार इत्यादींचे वितरण होणार आहे. तसेच, तीन इ-पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. विज्ञानप्रेमींनी या विनामूल्य कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट कॉंक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३
- विद्यानगर चेंढरे येथे 3BHK Semi-Furnished फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र :- १५६० चौ.फूट बिल्टअप संपर्क : PRO-LOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- 250 Sq/ft Gala for sale, shivaneri Appt.Near Vardhaman sale's- Alibag Revas - Road. East & Road facing. Mo. 9423377572 / 9028493434.
- 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.
- अलिबागमध्ये घरकामासाठी बाई पाहिजे वेळः ८-३० ते ५-३० कॉन्टॅक्ट मो. + ९१ ९५४५८४७२१२
- रेवदंडा येथे बाजारपेठेत भातगिरणीची जागा शेडसहीत विकणे आहे. एरिया- ४.५० गुंठे (NA) संपर्क : मोतीलाल जैन-८४४६८८००२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## कोलाड नाक्यावर बंदोबस्त

**। खांब । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोहा तालुका प्रशासन सज्ज झाले आहे. त्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गालगत असलेलल्या रोहा तालुक्यातील कोलाड येथील प्रवेशद्वारावर स्थिर सर्व्हेक्षण पथक तैनात करण्यात आले असून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रमात कोणत्याही प्रकारचा बाधा येऊ नये. तसेच, आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी या मार्गावर प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

## उरण परिसरात पालखी सोहळ्याची धूम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण परिसरातील ग्रामीण भागातील गावात सध्या ग्रामदैवत, देवीदेवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम सुरू आहे.

न्हावा गावची ग्रामदेवता गावदेवीचा यात्रा उत्सव बुधवारी दि. २३ तर पालखी सोहळा२४ रोजी साजरा करण्यात आला. समुद्र किनाऱ्यावरील डोंगरातील निसर्गाच्या सान्निध्यात मंदिरात विराजमान असलेल्या न्हावा ग्रामस्थांची ग्रामदैवत असलेल्या गावदेवीवर भाविकांची अपार श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळे दरवर्षी गावदेवीच्या यात्रा-पालखी सोहळ्यासाठी भाविकांची गर्दी उसळते.

करंजा येथील द्रोणगिरी देवीची यात्रा पालखी सोहळा ३० एप्रिल ते १ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर आणि निसर्गाच्या कुशीत वसलेल्या द्रोणगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर, सुबक मंदिरात द्रोणगिरी देवी वसलेली आहे. भक्ताच्या हाकेला धावणारी, भक्तांच्या नवसाला पावणारी द्रोणगिरी देवी अवघ्या पंचक्रोशीतील आगरी- कोळ्यांची माऊली म्हणून प्रसिध्द आहे.

# महावितरणच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

**। चौल । प्रतिनिधी ।**

**रात्रीच्या अंधारात प्रवाहित विद्युत तारा तुटून लोंबकळत होत्या, त्यामुळे रस्त्यावरुन जाणाऱ्या लोकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. परंतु, महातिवरणच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून रविवारी (दि. २१) मध्यरात्री एक वाजता वीजपुरवठा खंडित केला. त्यानंतर पडलेल्या तारा व्यवस्थित केल्या. त्याबद्दल चौलमळा येथील ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानून कौतुक केले.**

याबाबत सविस्तर हकीकत अशी की, चौलमळा येथे संतोष घरत यांच्या मुलाच्या हळदीचा कार्यक्रम सुरु होता. रात्रीच्या सुमारास एका बाजूला जेवणाच्या पंक्ती उठत असताना, दुसरीकडे काही मंडळी नाचण्यात दंग होते. यावेळी मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. दरम्यान, मंडपाशेजारी असणाऱ्या नारळाच्या झाडावरील झाप तारांवर पडला.

त्यामुळे विजेचा प्रवाह सुरु असणाऱ्या तारा तुटून लोंबकळत होत्या. त्याचवेळी प्रवाहित तारांमधून आगीच्या ठिणग्या बाहेर पडत होत्या. त्यामुळे काही काळ गोंधळ उडून लोक भयभीत झाले.



याठिकाणी पूर्णपणे अंधार होता. या ठिकाणी चालत येणाऱ्या व्यक्तीस तसेच मोटारसायकल व चारचाकी वाहनास सदर तारेचा अचानकपणे स्पर्ध होऊन गंभीर घटना होण्याची शक्यता होती. परंतु, त्याच सुमारास महावितरणचे कर्मचारी सूरज गावंड आपल्या घरी जात होते.

### चौलमळाकरांकडून कर्मचाऱ्यांचे कौतुक

प्रसंगावधान दाखवत त्यांनी येथून जाणारा प्रवाह खंडित केला. परिस्थितीचे गांभीर्य पाहून महातिवरणचे अन्य कर्मचारी शीतल राईलकर आणि नथुराम लोभी यांना तात्काळ संपर्क साधला. त्यांनीसुद्धा घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत होण्याकरिता हालचाली केल्या. मध्यरात्री विजेच्या खांबावर चढून तुटलेल्या तारांची जोडणी केली.

महावितरण विभागाची मदत पोहोचेपर्यंत चौलमळा गावचे प्रमुख रवींद्र घरत, अल्पेश घरत, सिद्धेश लोहार यांच्यासह ग्रामस्थांनी स्वतः सदर ठिकाणी थांबून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना सदरील प्रकाराची माहिती देऊन दक्षता घेण्याबाबत सूचना केल्या. दरम्यान, महावितरणचे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याचे ग्रामस्थांनी बोलून दाखविले.

# पेण रेल्वे स्थानकात चरस जप्त

। पेण । प्रतिनिधी ।

पेण रेल्वे स्थानकात पाच लाख रुपयांचे चरस जप्त करण्यात आले आहे. पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. के श्रवणकुमार कनकरत्नम (२७) रा. इंडिया बुल्स रेसिडेन्सी, पनवेल व महिला खुशबू दिलीप शहा (३०) रा. बदलापूर यांस ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे १ किलो २० ग्रॅम एकूण ५,२०,००० रूपये किमतीचे चरस व एक मोटारसायकल किंमत २०,००० व इतर वस्तू असा एकूण ५,२०,००० रूपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. सचिन वसंत मिणमिणे व सौ. सायली सचिन मिणमिणे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. राजाराम मल्हारी भगत यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. उक्रुळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८७ | ३/अ | ०-७२-९० पो.ख. ०-०१-५० | १२-८१ |

**यापैकी ०-१६-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे.**

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २५/०४/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. श्रीमती हेमलता बाळकृष्ण दवे, २. श्री. नविन बाळकृष्ण दवे, ३. श्री. अखिल बाळकृष्ण दवे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आगरसुरे | २८१/२ | ०-२१-०० | १.०९ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २५/४/२०२४

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी- ३०१ 'क्लिफ हेवन' को.
ऑप.हा. सोसायटी, स्टेट बँक
ऑफ इंडियाच्या बाजूला, मयुर
बेकरी समोर, कोर्ट रोड
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) रेखा रमेश वर्तक यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग | १२३ | ००.४०.५० पो.ख. ००.०२.५० एकूण ००-४३-०० | ०९.८१ |

वरील शेती मिळकती पैकी क्षेत्र ०.१५.२० हे. आर. या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/०४/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची फ्लॅट मिळकत तिचे मालक श्री. धिरज काशीनाथ राजगुरव यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील स. नं. ११/१/अ प्लॉट नं. ७, ८ व ९ या जमिन मिळकतीवर बांधलेल्या 'श्लोक रेसिडेन्सी'('श्लोक रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था) या इमारती मधील बी विंग मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका (फ्लॅट) क्र. ११ क्षेत्र ४६१ चौरस फुट कारपेट. जिचा कर्जत नगर परिषद यांचे कडील मालमत्ता क्र.नं Z2006846 असा आहे.

वर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त , चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तरी आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील फ्लॅट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०४/२०२४

**ॲड.महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १९/२ | ०-२४-४० पो.ख. ०-०४-५० एकुण ०-२८-९० पैकी श्रीमती निवेदिता नितीन पंडित यांचे १/३ अविभक्त हिश्याची मिळकत. | ३-९५ |

सदर मिळकतीबाबत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, वारस हक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, हवाला, मृत्युपत्र, साठेकरार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
तारीख : २५ एप्रिल २०२४

सही/-
**ॲड. गीतांजली जी. फुलावरे**
कार्यालय पत्ता.''मधुतारा'' बिल्डींग,
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. संदिप लडकु भोईर, रा. नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०१०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत -

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७०/१/ड | ०.३९.७० पो.ख.०.०२.३० एकूण ०.४२.०० | ४.८२ | श्री.मधुकर तुकाराम भागीत |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यनिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा ) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २५/०४/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल कलायसेल्वी श्रीनिवासा रामानुजर रा. रा. प्लॉट नं. ४६७/अ, बोरा भुवन, फ्लॅट नं.३०३, तिसरा मजला, डॉ. आंबेडकर रोड, महेश्वरी उद्यान जवळ, माटुंगा (पुर्व), मुंबई ४०००१९ यांनी खालील वर्णनाची मिळकत, खालील मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकांबरोबर दि.१८/०४/२०२४ रोजी साठेकरारसुध्दा केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ. मीटर) | आकार (रू.पै.) | मालकांचे नांव |
|---|---|---|---|---|
| शिरढोण, ता.पनवेल, जि. रायगड. | १८८/४ | ३३-७०-०० | ३३७ | १. मिर्जा असलम रशिद बेग २. मिर्जा सोहेल रशिद बेग |

सदरहू मिळकतीपैकी मिर्जा असलम रशिद बेग यांच्या हिश्श्याची १६-८५-०० चौ. मीटर इतक्या क्षेत्राची मिळकत ही या साठेकराराचा विषय आहे.

सदरहू मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहे असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २४/०४/२०२४.

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

सदर जाहीर सुचनेद्वारे सर्वास कळवण्यात येते की मौजे नागांव येथील गट नं. २३९४ ही मिळकत श्री. परेश गांजावाला ह्यांचे नावे आहे. सदर मिळकतीचे दक्षिण पूर्व भागास लागून गट नं. २२७४ हि मिळकत श्री. चंद्रकांत कुंटे वगैरेची सामाईक मालकीची मिळकत आहे. गट नं. २२७४ या मिळकतीचे पुर्वेस गट नं. २३९८ ही भास्कर चितळे वगैरेची सामाईक मालकीची मिळकत आहे. गट नं. २२७४ या मिळकतीची हद्द कायम मोजणी सन २०२३ मध्येच झाली असून या मिळकतीच्या हद्दी खूणा कायम करण्यात आलेल्या आहेत. सदर गट नं. २२७४ आणि गट नं. २३९८ या मिळकतींचा वापर संबंधित सहमालक आणि गट नं. २३९५ मधील मालक जाण्या-येण्याकरिता करीत आहेत. तसेच गट नं. २२७४ मधील विहिरीवरही गट नं. २३९५ वरील मालकांचा हक्क आहे, तसा वापर ते करीत अहेत.

गट नं. २३९४ ही मिळकत विक्रीस काढण्यात आल्याचे समजते. सदर मिळकत पाहणेकरिता संबंधी मध्यस्थी इसम, प्रस्तावित खरेदीदार प्रत्याक्ष जागेवर ये-जा करीत आहेत. मात्र गट नं.२३९४ चे लगत वर नमूद मिळकती असून वर नमूद केलेनुसार परिस्थिती आहे. तरी गट नं. २३९४ ह्या मिळकतीच्या हद्दीबद्दल खातरजमा करूनच व्यवहार करावा. वर परिस्थिती व हक्कास बाधा येईल असे कृत्य गट नं. २३९४ या मिळकतीबद्दल व्यवहार करताना करू नये. तसे झाल्यास व संबंधीतांचे हक्कास बाधा आल्यास कायदेशीर ईलाज केला जाईल ह्याची नोंद घ्यावी.

श्री. चंद्रकांत दा.कुंटे, श्री. सुधाकर य. कुंटे, श्री. शेखर पु. कुंटे, श्री. अभिषेक प्र. कुंटे सर्व रा. खालची आळी, नागाव, ता. अलिबाग

ठिकाण :- अलिबाग
दिनांक : २४/०४/२०२४

सही/-
**ॲड. सचिन धिरजलाल मकाणी**
बी. कॉम.एलएल. बी.
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
मोबा नं.९८२२९८२८२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. रमेशसिंह हरिसिंह ठाकुर व सौ. रेखा रमेश सिंह, रा. ७०१, मोराज रिव्हर साईड पार्क, बिल्डींग नं. एस ६, गोदरेज कॉलनी जवळ, पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

| गावाचे नाव | स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| मिरचोली | १९/४ | ०.०९.०० | ०.११ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | ३२/६ | ०.०६.०० | ०.०६ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २३/३अ | ०.०१.०० | ०.०२ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २३/५/अ | ०.०२.०० | ०.०२ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २३/८/अ | ०.०९.०० | ०.०२ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २३/१२/अ | ०.२३.३० | ०.२२ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २३/४ | ०.२९.८० | ०.२० | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई . |
| | २२ | ०.५२.०० | ०.५३ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | ३१/३ | ०.२२.५० | ०.१९ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | ३२/८ | ०.१३.७० | ०.०९ | सुमेधा भिमराव देसाई व गार्गी भिमराव देसाई |
| | २०/१ | ०.१४.०० | १.२५ | मोहनलाल फुटरमल जैन वैगेरे |
| | १८/७/अ | ०.०२.०० | ०.०३ | मोहनलाल फुटरमल जैन वैगेरे |
| | १८/१० | ०.०३.०० | ०.०३ | मोहनलाल फुटरमल जैन वैगेरे |
| | १८/५ | ०.११.०० | ०.०६ | मोहनलाल फुटरमल जैन वैगेरे |
| | १८/८/अ | ०.०१.०० | ०.०२ | मोहनलाल फुटरमल जैन वैगेरे |
| | २३/३/ब | ०.१६.७० | २.२४ | संतोष वसंत मालुसरे वैगेरे |
| | २३/६ | ०.८४.५० | ७.९९ | संतोष वसंत मालुसरे वैगेरे |
| | ३२/९ | ०.१४.७० | ०.१२ | संतोष वसंत मालुसरे वैगेरे |
| | २३/५/ब | ०.५२.४० | ७.१० | संतोष वसंत मालुसरे वैगेरे |
| | २३/८/ब | ०.१४.७० | २.३० | संतोष वसंत मालुसरे वैगेरे |
| | ३१/१ | ०.३०.१० | १.१५ | जिजाबाई तुकाराम मालुसरे वैगेरे |
| | ११/२ | ०.३८.०० | ५.५७ | सुशिल नारायण सुर्वे |
| जिते | १०७/१५ | २.५८.०० | २५.८० | अशोक जिवराज जैन |
| नसरापुर | ७०/१/ड | ०.४२.०० | ४.८२ | मधुकर तुकाराम भागीत |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यनिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या २१ (एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २५/०४/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील १ श्री. तानाजी काशीनाथ शिंदे, २ श्री. संभाजी काशीनाथ शिंदे, ३ श्री. बाळकृष्ण काशीनाथ शिंदे, ४ श्री. रंभाजी काशीनाथ शिंदे, ५ श्री. रमेश काशीनाथ शिंदे यांचे मालकीची सर्व्हे नं. ३२/२२, ३२/२६अ, ३२/२६ब, ४०/१६, ४०/१७अ, ४०/१८ या मिळकतीबाबत दिनांक २४/०४/२०२४ रोजीचे दैनिक कृषीवल वृत्तपत्राचे पान क्र. ७ वर जाहीर नोटीस प्रसिद्ध करून हरकती मागविल्या आहेत. सदर नोटीस जाहीर करताना मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सर्व्हे नंबर चुकून जाहीर झालेला आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ४० | १५ अ | १-६७-०० | ०-८९ |

मौजे हालिवली येथील सर्व्हे नं. ४०/१५अ या मिळकतीकरीता सदर दिनांक २४/०४/२०२४ रोजीची जाहीर नोटीस चुकीने प्रसिद्ध झाली आहे. सबब सदर दिनांक २४/०४/२०२४ रोजीचे दैनिक कृषीवल वृत्तपत्राचे पान क्र. ७ वर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर नोटीस मधून वरील सर्व्हे नं. ४०/१५ अ चुकून प्रसिद्ध झाल्यामुळे वाचण्यात येऊ नये. सर्व्हे नं. ४०/१५ अ ही मिळकत सोडून उर्वरीत मिळकतींकरीता दिनांक २४/०४/२०२४ रोजीची जाहीर नोटीस वाचणेत यावी याकरीता सदरची दुरुस्ती नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २५/०४/२०२४.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९८५०४०२६५७

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात, जि. रायगड.**

दिवाणी चौकशी अर्ज नं. ४१/२०२४
नि. ७ /ड

१) श्रीमती धनश्री विहंग अभ्यंकर
वय ४२ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा. बी २- ३०३, सृष्टी रेसीडेन्स्य,
न्यु कल्याण रस्ता, आर के टॉवर मागे,
कांचेंगओण डोंबिवली (पूर्व) कल्याण, ठाणे
२) श्री.ऋषिकेश रणजीत करंदीकर — अर्जदार
वय ३९ वर्षे, धंदा - व्यवसाय
३) श्री. रणजीत लक्ष्मण करंदीकर
वय ७४ वर्षे, धंदा-निवृत्त
दोघेही रा. १६ प्रांजली बिल्डिंग, गोशाळा रोड,
मुलूंड (पश्चिम), मुंबई ४०००८०
मो. ७७७५९७७१११
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी या जाहीर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,
१) अर्जदार क्र. १ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ यांची पत्नी कै. चंदप्रभा रणजीत करंदीकर हिचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.
२) अर्जदार क्र. १ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ यांची पत्नी कै. चंदप्रभा रणजीत करंदीकर हिची खालील नमुद खालील नमूद केलेली मिळकत आहे.

मौजे अलिबाग, सिटी सर्व्हे नं. ७५३ अे व ७५३ क या मिळकतीवर असलेली रुद्राक्ष को. ऑप. हौ. सोसायटी अलिबाग मधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १, क्षेत्र ३६ चौ. मी. कार्पेट असून त्याचा अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र. १५८४, नवीन मालमत्ता क्र. ZIBHA001904 असा आहे. अशाप्रकारे वर नमुद केलेली मिळकत आहे.

सदर वर नमुद केलेली मिळकत अर्जदार यांना मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वरील सर्व वर नमुद केलेल्या मिळकतींचे कायदेशीर वारस म्हणून वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मयत चंद्रप्रभा रणजीत करंदीकर हिच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या अर्जाची पुढील दि. / / २०२४ रोजी स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक २३ माहे ०४ सन २०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,**
**अलिबाग - रायगड**

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड.**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-प | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| काशीनाथ नारायण बांगर | ४९ | ५ | ०-२५-९० | १-५० |
| | ४९ | ६ | ०-३५-८० | १-२५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २५/०४/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, नांदगाव ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशिल स्वप्नील अशोक वाघाये व पारुल स्वप्नील वाघाये हे नामदेव तुकाराम कोंडीलकर या विद्यमान मालकाकडून खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४४/१ | अ | ०-३५-९० | २.१२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२५-०४-२०२४
मो.नं.९२८४६७७५१६

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु.पो. कोंदिवडे ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलल्या मिळकतीमधील ०-१३-३६ हे. आर. एवढे क्षेत्र मिळकतीचे विद्यमान मालक श्री. उदय रामचंद्र मोरे यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग, जि. रायगड | ४९३/२ | ०-९३-७० | १५.४० |

वर नमूद मिळकतींपैकी उदय रामचंद्र मोरे यांच्या मालकीचे ०-१३-३६ हे.आर. क्षेत्र.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.२५.०४.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

**निवडक**

### ओबामा सचिनचे चाहते

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष हे सुद्धा सचिन तेंडुलकरचे मोठे चाहते आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना त्यांनी सचिनची प्रशंसा केली होती. ओबामा म्हणाले होते, मला क्रिकेट या खेळाबद्दल फारशी माहिती नाही. पण, तरीही मी सचिन तेंडुलकर फलंदाजी करत असताना क्रिकेट आवर्जून पाहतो. यासाठी नाही की, मला सचिनचा खेळ फार आवडतो. पण, मला हे जाणून घ्याचचं होतं की, असं काय कारण आहे की, जेव्हा सचिन तेंडुलकर फलंदाजीसाठी उतरतो, तेव्हा माझ्या देशाचं उत्पादन पाच टक्क्यांनी कमी होतं.

### सेहवागचे उद्दाम उत्तर

**नवी दिल्ली :** सेहवाग हा आपल्या धडाकेबाज फलंदाजीसोबतच बेधडक वक्तव्यांसाठी देखील प्रसिद्ध आहे. अर्थात सेहवागने गिलख्रिस्टला विनोदाचा भाग म्हणून उद्दाम उत्तर दिलं आहे. सेहवाग आणि गिलख्रिस्ट हे एका कार्यक्रमात बोलत होते. त्यावेळी गिलख्रिस्टने येत्या काळात भारतीय खेळाडू दुसऱ्या टी-२० लीगमध्ये खेळताना दिसतील का, असा प्रश्न विचारला. त्यावर सेहवाग विनोदाने म्हणाले की, आम्हाला गरज नाही. आम्ही श्रीमंत लोकं आहोत. आम्ही दुसऱ्या गरीब देशात लीग खेळण्यासाठी जात नाही.

### जयस्वालची लाराला मिठी

**मुंबई :** सोमवारी आयपीएल स्पर्धेतील ३८ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबईला ९ विकेट्सने पराभवाचा धक्का दिला. राजस्थाच्या या विजयात २२ वर्षीय सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने महत्त्वाचे योगदान दिले. झाले असे की, वेस्ट इंडिजचे दिग्गज फलंदाज ब्रायन लारा या आयपीएलमध्ये सम ालोचन करत आहेत. ते सामन्यानंतर राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनशी बोलत होते. त्यावेळी जैस्वालने त्यांना पाहिले आणि त्याने पळत येत थेट लारा यांना कडकडीत मिठी मारली.

### मलिंगाचा पुन्हा अपमान

**मुंबई :** हार्दिकचे डोके ठिकाणावर आहे का, असा प्रश्न आता चाहते विचारत आहेत. कारण आता तिसऱ्यांदा हार्दिकने संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगाचा अपमान केला आहे. राजस्थानविरुद्ध मुंबईचा सामना झाला. हा हार्दिकचा १०० वा सामना होता. त्यामुळे मलिंगा त्याला खास जर्सी देत होता. यावेळी सर्व खेळाडूंना टाळ्या वाजवल्या. त्यानंतर मलिंगा हार्दिकला मिठी मारायला गेला, पण हार्दिकने त्याच्याकडे चक्क दुर्लक्ष केले. त्याने हे खास टी शर्ट दुसऱ्या खेळाडूकडे दिले आणि मलिंगाचा पुन्हा एकदा अपमान केला.

### हार्दिकचा विक पॉईंट

**मुंबई :** हार्दिकला कोणता चेंडू त्रस्त करत आहे, याबद्दलची एक आकडेवारीही समोर आली आहे. आयपीएलमध्ये फुलटॉस चेंडू खेळताना काहीसा अडखळताना दिसला. त्याने ८ सामन्यांतील ३ डावात ४ फुलटॉस चेंडूंचा सामना केला असून चारच धावा केल्या आहेत. तो ३ डावात दोनवेळा फुलटॉसवर बाद झाला आहे. एकूणच ही आकडेवारी फक्त मुंबईचेच नाही, तर भारतीय संघाचेही टेंशन वाढवणारी आहे. आगामी वर्ल्डकपमध्ये संधी मिळाली, तर फुलटॉस चेंडू त्याच्याविरुद्ध प्रतिस्पर्ध्यांसाठी एक अस्त्र ठरू शकते.

# करातेपटूंची चमकदार कामगिरी

## ■ सुवर्णसह ३५ पदके मिळवून जिल्ह्याचे नावलौकिक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील रसायनी–मोहपाडा येथे राष्ट्रीय स्पर्धा रविवारी पार पाडली. या स्पर्धेत अलिबागच्या करातेपटूंनी चमकदार कामागिरी बजावत ३५ पदके मिळविली. या सर्व खेळाडूंचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहेत.**

श्रीसाईबाबा संस्थान केंद्र येथे चौथी सोके कप कराटे चॅम्पीयनशीप स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचे आयोजन राजू कोळी व त्यांच्या संघाने केले होते. जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. अलिबागमधील खेळाडूंनी कटा व कुमिते अशा वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवत १८



खेळाडूंनी ३५ पदके पटकाविली आहेत. त्यात सहा सुवर्ण, १५ रौप्य व १४ कांस्य पदकांचा समावेश आहे. ही पदके मिळवून अलिबागच्या करातेपटूंनी मानाच्या सोके कपवर आपले नाव कोरले. श्रीयांस तावडे, मुमुक्षा घरत, तनिष्क तावडे, तुबा गोंडेकर, मदयान कडीरी, प्रिया देशमाने, आरोही जगे, इशिता मांडवकर, वरद देशमाने, रुही ठाकूर, अवनी पाटील, कायरा घरत, दक्ष पाटील, सुकांत पेरियासामी, श्लोक पाटील, वीर अजिंक्य, श्रीनिष मढवी, आरव प्रजिश या खेळाडूंनी यश मिळविले. पंच म्हणून शिहान डी. मथिवानन यांनी या स्पर्धेत काम पाहिले आहे. त्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. सर्व विद्यार्थी क्योशी राहुल तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

### करादे प्रशिक्षणाचा वाढता क्रेझ

**पुर्वी कराटेचे प्रशिक्षण मोठ्या शहरापुरता मर्यादीत होते. मात्र कराटे शिकण्याचा क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. आता लहान शहरांपासून ग्रामीण भागातदेखील कराट्यांचे धडे घेण्याची आवड निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून तरुण मंडळीदेखील कराट्यांचे प्रशिक्षण घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मोबाईलमध्ये रमणाई बच्चे कंपनीसह तरुणाई कराटे शिकण्यामध्ये लक्ष देत आहेत. त्यामुळे मुलांच्या शारीरिक व बौध्दीक विकासालादेखील चालना मिळत असल्याचे प्रशिक्षकांकडून सांगितले जात आहे. मुलांबरोबरच मुलींमध्ये स्वरक्षणाचे धडे यातून मिळत असताना त्यांच्यामध्ये एकाग्रतादेखील निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे.**


> **अलिबागमध्ये कराटेचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शाळांमध्यदेखील कराटेचे धडे दिले जात आहेत. अलिबागमधील मुले राष्ट्रीय कराटे स्पर्धेत घवघवीत यश मिळवित असल्याचा आनंद होत असून अलिबागचे नाव जिल्हा, राज्य, देश पातळीवर अधिक उंचावत असल्याचे दिसून येत आहे.**
> **– राहूल तावडे, कराटे प्रशिक्षक**

# टोरांटोमध्ये भारतीय वादळः गॅरी कॅस्पारोव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा १७ वर्षीय डी. गुकेश याने रविवारी आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्यपदावर मोहर उमटवताना ऐतिहासिक कामगिरी केली. जागतिक स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या गुकेशवर चोहोबाजूंनी कौतुकाचा वर्षाव होऊ लागला. याच पार्श्वभूमीवर रशियाचे महान बुद्धिबळपटू गॅरी कॅस्पारोव यांनीही गुकेशच्या पाठीवर कौतुकाची थाप मारताना म्हटले की, टोरांटोमध्ये भारतीय वादळ आले.

गॅरी कॅस्पारोव यांनी वयाच्या २२व्या वर्षी १९८४ मध्ये आव्हानवीरांची बुद्धिबळ स्पर्धा जिंकत जगज्जेतपदासाठीच्या लढतीत ॲनातली कारपोव यांच्याशी दोन हात केले. डी. गुकेश याने यंदाच्या आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्यपदाचा मान संपादन केला. तोही वयाच्या १७व्या वर्षी. त्याने कॅस्पारोव यांचा ४० वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला. याप्रसंगी कॅस्पारोव यांनी सोशल मीडियावर गुकेशची स्तुति करताना म्हटले की, टोरांटोमध्ये डी. गुकेशच्या रूपात भारतीय वादळ आले. जागतिक बुद्धिबळाच्या पटावर नवी क्रांती घडून आली. आता जगज्जेतपदाच्या लढतीत गुकेशसमोर चीनच्या डिंग लिरेन याचे आव्हान असेल.



# जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ भारतात?

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

जागतिक बुद्धिबळ विश्वात इतिहास घडवणारा भारताचा डी. गुकेश आणि विद्यमान विश्वविजेता चीनचा डिंग लिरेन यांच्यात होणारी यंदाची जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धा भारतात खेळवण्यासाठी भारतीय बुद्धिबळ संघटना सर्व शक्यता पडताळत आहेत.



भारतीय बुद्धिबळ क्षितिजावरचा नवा तारा असलेल्या गुकेशसाठी आम्ही मोठी बक्षीस रक्कम देणार आहोत, अशी घोषणा भारतीय बुद्धिबळ संघटनेटचे अध्यक्ष नितीन नारंग यांनी केली. कॅनडात सोमवारी पार पडलेल्या आव्हानवीरांच्या स्पर्धेत १७वर्षीय गुकेशने विजेतेपद मिळवून बुद्धिबळ विश्वाला थक्क केले. आम्ही सर्व परिस्थिती आणि शक्यतांचा अभ्यास करत आहोत, येत्या काही दिवसांत त्याबाबत स्पष्टता येईल.

संधी मिळाली तर आम्ही निश्चितच जागतिक अजिंक्यपदाची लढत भारतात खेळण्यासाठी प्रयत्न करू, मात्र त्यासाठी प्रायोजक आणि सरकार यांचे सहकार्य महत्त्वाचे असेल, असे नारंग यांनी सांगितले. बुद्धिबळ क्षेत्रातील ही सर्वात प्रतिष्ठेची लढत आयोजित करण्यासाठी भारताने यजमानपदाच्या शर्यतीत उडी मारली तर अनेक प्रायोजक तयार आहेत, असे वृत्त आहे; परंतु त्या संदर्भात अधिक बोलण्यास नारंग यांनी नकार दिला.

### विश्वचषकात खेळण्यास नकारच

**कोलकाता :** वेस्ट इंडिजचा अष्टपैलू सुनील नारायण आंतरराष्ट्रीय निवृत्तीवर ठाम असून आगामी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत खेळण्यासाठी आपण उपलब्ध नसल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. नारायणने आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना ऑगस्ट २०१९ मध्ये खेळला होता. यंदा वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत टी-२० विश्वचषक होणार आहे. घरच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेसाठी सर्वोत्तम संघ निवडण्याचा वेस्ट इंडिजचे क्रिकेट मंडळाचा मानस आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय पुनरागमनाचे दार आता बंद झाल्याचे नारायणने स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्राच्या खेळाडूंची निवड

**। नागपूर । प्रतिनधी ।**

दुबई येथे बुधवारी (दि.२४) सुरू झालेल्या आशियाई ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी ६० खेळाडूंचा भारतीय संघ जाहीर करण्यात आला असून त्यात महाराष्ट्राच्या सात ॲथलिट्सचा समावेश आहे. ही स्पर्धा दि. २७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत लिमा (पेरू) येथे होणाऱ्या जागतिक ज्युनिअर स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धाही आहे. गेल्या वर्षी कोरियात झालेल्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी सहा सुवर्णपदकांसह १९ पदके जिंकली होती.



भारतीय संघात महाराष्ट्राच्या गौरव भोसले (पुणे), निखिल ढाके, अनुष्का कुंभार, प्राची देवकर (सातारा), रुजुला भोसले, साक्षी चव्हाण, सिया सावंत (मुंबई) यांचा समावेश आहे. गौरव हा माजी आंतरराष्ट्रीय धावपटू भास्कर भोसले यांचा मुलगा असून त्याची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा होय. तो ३००० व ५००० मीटर शर्यतीत सहभागी होईल.

अनुष्का ही आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या बाबतीत अनुभवी असून ती ४०० मीटर हर्डल्स व ४-४०० मीटर रिले शर्यतीत सहभागी होणार आहे. तिने यापूर्वीही ज्युनिअर, युवा आशियाई व जागतिक ज्युनिअर स्पर्धेत भाग घेतला आहे. रुजूला, साक्षी व सिया या तिघी ४-१०० मीटर रिले शर्यतीत सहभागी होतील.

### फलंदाजीच्या क्षमतेत घट

**मुंबई :** हार्दिक पांड्याची चेंडू जोरात टोलावण्याची क्षमता कमी होत चालली आहे. व्यापक विचार करता ही चिंतेची बाब आहे, अशा शब्दात इरफान पठाणने हार्दिकचा समाचार घेतला आहे. इरफान पठाण हार्दिकचा प्रत्येक वेळी समाचार घेताना दिसत आहे. राजस्थानविरुद्ध झालेल्या मुंबई संघाच्या एकतर्फी पराभवानंतर एक्सवरून आपले मत मांडताना इरफानने हार्दिकची आक्रमक फलंदाजी करण्याची क्षमता कमी होत चालल्याचे म्हटलेच आहे. फलंदाजीस पोषक असलेल्या खेळपट्टीवर एकवेळ आक्रमक फलंदाजी सोपी असेल; पण जेथे चेंडू स्वींग होतो, तेथे तर हार्दिक अपयशी ठरतोय, असेही इरफान स्पष्ट करतो.

# जयस्वालला विश्वचषक खेळण्याची संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड येत्या काही दिवसांत होणार आहे. आणि योग्य वेळी यशस्वी जयस्वालने शानदार शतकी खेळी करून आपली दावेदारी सिद्ध केली. या आयपीएलमध्ये आत्तापर्यंत अपयशीठरत असलेल्या जयस्वालने मुंबईविरुद्धच्या सामन्यात ६० चेंडूत नाबाद १०४ धावा ठोकल्या. यादरम्यान त्याने ७ षटकार ९ चौकार मारले.

आयपीएल अगोदर झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत दोन द्विशतके करत कमालीचा फॉर्म दाखवणारा जयस्वाल आयपीएलमध्ये प्रभाव पाडू शकला नव्हता. त्यामुळे टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी त्याच्या नावाचा विचार होण्याची शक्यता मावळत चालली होती, ऐन मोक्याच्या क्षणी त्याने भारतीय कर्णधार रोहित शर्मासमोर शतक करून त्याचीही वाहवा मिळवली.



# मार्कस स्टॉयनिसचा उलटवार

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

मार्क स्टॉयनिसने ६३ चेंडूंमध्ये नाबाद १२४ धावांची संस्मरणीय खेळी साकारताना लखनौ संघाला चेन्नई संघावर सहा विकेट व तीन चेंडू राखून सनसनाटी विजय मिळवून दिला. त्याने आपल्या खेळीत तेरा चौकार व सहा षटकारांचा पाऊस पाडला. लखनौचा हा आयपीएलच्या यंदाच्या मोसमातील पाचवा विजय ठरला. चेन्नईला चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

चेन्नईकडून लखनौसमोर २११ धावांचे आव्हान ठेवण्यात आले. दीपक चहरे क्विंटॉन डी कॉक याला शून्यावरच बाद करीत लखनौला बॅकफूटवर ढकलले. कर्णधार के. एल. राहुलला मोठी खेळी करता आली नाही. मुस्तफिजूर रहमानच्या गोलंदाजीवर आक्रमक फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो ऋतुराजकरवी झेलबाद झाला. यानंतर मार्कस स्टॉयनिस व देवदत्त पडिक्कल जोडीने ५५ धावांची भागीदारी रचली. ही जोडी धावफलक पुढे नेत होती.

मथिशा पथिरानाने स्वत:च्या पहिल्याच षटकात देवदत्तला (१३ धावा) त्रिफळाचीत केले व जोडी तोडली. मार्कस स्टॉयनिस व निकोलस पूरन या जोडीने लखनौच्या विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दोघांनी ७० धावांची शानदार भागीदारी रचली. दोघांच्या झंझावातापुढे चेन्नईचे गोलंदाज निष्प्रभ ठरले. स्टॉयनिसने स्वबळावर लखनौला देदीप्यमान विजय मिळवून दिला.



### इरफान पठाणचा भारतीय संघ

**नवी दिल्ली :** इरफान पठाणने आगामी टी-२० विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे. ज्यामध्ये सॅमसन, केएल राहुल, सलामीवीर कर्णधार रोहितसह जैस्वाल, कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर, चौथ्या क्रमांकावर सूर्यकुमार आणि पाचव्या क्रमांकावर पंत. याशिवाय रिंकू, हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे या दोघांची अष्टपैलू म्हणून, सोबत जडेजा व्यतिरिक्त त्याने चहल आणि कुलदीप यांची निवड. बुमराह, सिराज आणि अर्शदीप यांची वेगवान गोलंदाज म्हणून निवड तर गिलचीही बॅकअप सलामीवीर म्हणून निवड केली आहे.

# रायगड जिल्हा क्रिकेट निवड चाचणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याचा २३ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे दि.२६ व २७ एप्रिल रोजी उरण येथील भेंडकळ क्रिकेट अकॅडमी येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे २३ वर्षाखालील मुलांची आमंत्रितांची स्पर्धा घेण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील रहिवासी असलेले १ सप्टेंबर २००१ ते ३१ ऑगस्ट २००५ या कालावधीत जन्मलेले खेळाडू या निवड चाचणीसाठी पात्र असणार आहेत. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपल्या आधार कार्डची स्वतःची सही केलेली झेरॉक्स प्रत व मूळ आधार कार्ड, स्वतःचे २ रंगीत पासपोर्ट साईज फोटो व जन्म दाखला तसेच, निवड चाचणी शुल्क २०० रुपये असून क्रिकेटच्या पांढरा पोशाख परिधान करून स्वतःच्या क्रिकेट किटसह खेळाडूंनी सकाळी ८.३० वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रशांत ओक ९८२२४२२६७६, चंद्रकांत मते ०९८२२८ ३६४४२ यांच्याशी संपर्क साधावा.

# लॉरेओ पुरस्काराचे मानकरी

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या लॉरेओ पुरस्कारासाठी यंदा सर्बियाचा तारांकित टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणि स्पेनची महिला फुटबॉलपटू ऐताना बोनमती यांची निवड करण्यात आली. जोकोविचने गेल्या वर्षी एटीपी फायनल्ससह तीन ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळवली होती.

कारकीर्दीत विक्रमी २४ ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळवणारा जोकोविच पाचव्यांदा या पुरस्काराचा मानकरी ठरला. जोकोविचने येथेही स्वित्झर्लंडचा २० ग्रँडस्लॅम विजेता माजी टेनिसपटू रॉजर फेडररशी बरोबरी केली. माद्रिद येथे झालेल्या एका विशेष सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

महिला विभागात या पुरस्काराची मानकरी ठरलेली बोनमती हा सन्मान मिळवणारी पहिली फुटबॉलपटू ठरली आहे. या वेळी महिला विश्वचषक विजेत्या स्पेन संघाचाही सन्मान करण्यात आला. प्रथमच ही स्पर्धा जिंकल्याबद्दल त्यांना २०२३ वर्षातील सर्वोत्तम संघ म्हणून निवडण्यात आले.



# क्रिकेटच्या देवाचा ५१वा वाढदिवस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

***आजघडीला भारतात क्रिकेटचे चाहते क्रिकेटला धर्मासारखे जवळचे मानतात. पण हा खेळ भारतात इतका प्रसिद्ध करण्यात महान फलंदाज सचिन तेंडुलकरचे महत्त्वाचे योगदान होते. म्हणूनच त्याला ‘क्रिकेटचा देव’ म्हटलं जाते.***

*तीन दशकांहून अधिक काळ क्रिकेटच्या मैदानावर राज्य करणारा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने बुधवारी (दि.२४) ५१ वा वाढदिवस साजरा केला. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत जन्मलेल्या सचिनने वर्षानुवर्षे मैदानावर कठोर परिश्रम केले. देशाचे नाव सर्वत्र गाजवून हे यश संपादन केले.*

*सचिनला लहानपणापासूनच क्रिकेट खेळण्याची आवड होती. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्याने भारतीय संघात पदार्पण केले. सचिनने १९८९ रोजी पाकिस्तानविरुद्ध पहिला सामना खेळला होता. मात्र, यात तो मोठी खेळी करू शकला नाही. पहिल्या सामन्यात सचिन केवळ १५ धावा करून बाद झाला. १९८७ मध्ये भारतीय भूमीवर पहिला विश्वचषक आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेच्या वेळी सचिन फक्त १४ वर्षांचा होता. तो बॉल बॉय म्हणून काम करत होता. बॉल बॉय म्हणून त्याने विश्वचषक सामना चांगला पाहिला होता. तो बरंच काही शिकला होता.*

*क्रिकेटमधील योगदानाबद्दल सचिनला २०१४ मध्ये मभारतरत्न, १९९८ मध्ये पद्मश्री, १९९७ मध्ये राजीव गांधी क्रीडा पुरस्कार, २००८ मध्ये पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आले. इतके पुरस्कार मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे.*



## सचिनचे दहा विक्रम मोडणे आजही अशक्य

### २४ वर्षांची क्रिकेट कारकीर्द

***सचिनला अनेकदा ‘ क्रिकेटचा देव’ म्हणून संबोधलं जातं. तो क्रिकेटचा महान फलंदाज मानला जातो. तब्बल ६६४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४८.५२ च्या सरासरीनं ३४,३५७ धावा करत सचिन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक १०० शतकं आणि १६४ अर्धशतकं केली आहेत. क्रिकेटच्या इतिहासात शंभर शतकं करणारा तो एकमेव खेळाडू आहे.***

**सचिनचे हे विक्रम मोडणे अशक्य**

*१. कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसह एकूण ६६३ आंतरराष्ट्रीय सामने.*
*२. सर्वाधिक २०० कसोटी सामने.*
*३. विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम.*
*४. तब्बल २२ वर्षे ९१ दिवस एकदिवसीय प्रदीर्घ कारकीर्द.*
*५. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक ५१ शतके.*
*६. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ३४,३५७ धावा.*
*७. कसोटीत सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम.*
*८. एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक सामनावीर पुरस्कार.*
*९. ६ विश्वचषक खेळणारा सचिन हा एकमेव क्रिकेटपटू आहे. त्याने ९९२, १९९६, १९९९, २००३, २००७ आणि २०११ चे विश्वचषक खेळले आहेत.*

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)